




दैनिक **युवावार्ता**

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25









वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८८ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । ११/०४/२०२६ । पाने - ८







# निळवंडे धरणातून १४०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - उन्हाची वाढती तीव्रता आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेऊन गुरुवारी सायंकाळी निळवंडे धरणातून पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले. धरणातून प्रवरा नदीपात्रात १४०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. पाणी सोडतेवेळी निळवंडे धरणात ५५१५ दलघफु म्हणजेच ६६.२९ टक्के पाणी शिल्लक होते.

लाभक्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने भंडारदरा धरणातून बिगरसिंचनाचे आवर्तन तातडीने सुरू करण्याच्या सूचना जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. संगमनेर, राहाता व श्रीरामपूर तालुक्यांतील बहुतांश गावांत पाणीटंचाई भासू लागल्याने आणि

गावपातळीवरील पाण्याचे स्रोत कमी पडल्याने नगरपरिषदांसह ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रातही परिस्थिती निर्माण झाली आहे.

धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करावे आणि आवर्तन सुरू करताना शेवटच्या गावापर्यंत पाणी मिळेल याची दक्षता संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. पाण्याचा अपव्यय होणार नाही यासाठी काळजी घेण्यास सांगण्यात आले असून, या आवर्तनाचा लाभ संगमनेर, राहाता व श्रीरामपूर तालुक्यांतील नागरिकांना होणार आहे.

धरणातील पाणीसाठा - भंडारदराः ६३४४ दलघफु (५७.४७ टक्के), निळवंडे: ५५१५ दलघफु (६६.२९ टक्के) इतका आहे.

# तीन राज्यात बम्पर मतदान

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशातील दोन राज्ये, आसाम, केरळ आणि केंद्रशासित प्रदेश पुडुचेरी येथे गुरुवारी विधानसभा निवडणुकीसाठी विक्रमी मतदान झाले. १९५० मध्ये आसाम राज्याची स्थापना झाल्यापासून राज्यात सर्वाधिक ८५.९१% मतदान झाले. यापूर्वी २०१६ मध्ये ८४.७% मतदान झाले होते.

तर पुडुचेरीमध्ये स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक ८९.८७% मतदान झाले. यापूर्वीचा विक्रम ८५% (२००६, २०११ आणि २०१६ विधानसभा निवडणुका) होता. केरळमध्ये गेल्या ४९ वर्षांतील दुसरे सर्वाधिक मतदान झाले, येथे ७८.२७% मते पडली. १९७७ मध्ये विक्रमी ७९.२% मतदान झाले होते.

मतदानाच्या टक्केवारीचे आकडे ९ एप्रिल रोजी रात्री ११.३० वाजेपर्यंतचे आहेत. निवडणूक आयोगाकडून अंतिम आकडेवारी जाहीर होणे बाकी आहे. आसाममध्ये १२६ जागांवर ४१ पक्षांच्या ७२२ उमेदवारांच्या नशिबाचा फैसला होईल. ३५ जिल्ह्यांपैकी २६ पेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये ८०% पेक्षा जास्त मतदान झाले. सर्वाधिक ९५.५६% मतदान दक्षिण सालमारा मनकचर जिल्ह्यात झाले. सर्वात कमी ७५.२५% मतदान पश्चिम कार्बी आंगलोंगमध्ये झाले.

मुख्यमंत्री हिमंता म्हणाले - आसामी समाजातील मतदारांमुळे मतदान वाढले आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा म्हणाले, बांगलादेशी वंशाच्या मुस्लिम समाजाचे मतदान ९५ ते ९६ टक्के असायचे, पण उर्वरित आसामी समाजात ते ७५-७६ टक्के असायचे. यावेळी दोन्ही समाजात स्पर्धा होती. पारंपारिकपणे जो समाज सक्रिय मतदान करतो, त्यांनी तर जास्त मतदान केलेच आहे, पण ज्या समाजात पारंपारिकपणे जास्त मतदान होत नाही, त्या समाजानेही मोठ्या उत्साहात मतदान केले.

केरळमधील कोझिकोडमध्ये सर्वाधिक ८१.३२% मतदान- केरळमध्ये १४० विधानसभा जागांवर २.६ कोटी मतदार आहेत. तर ८८३ उमेदवारांनी निवडणूक लढवली होती. राज्यातील १४ जिल्ह्यांपैकी दोन जिल्ह्यांमध्ये ८०% पेक्षा जास्त मतदान झाले. तर १० जिल्ह्यांमध्ये ७०% पेक्षा जास्त मतदान झाले आहे. सर्वाधिक ८१.३२% मतदान कोझिकोडमध्ये झाले. तर सर्वात कमी ७०.७६% मतदान पथनमथिट्टामध्ये झाले. केरळमध्ये २.७१ कोटी मतदार ८९० उमेदवारांमधून आपला नेता निवडत आहेत.



पुदुचेरीमध्ये विक्रमी सुमारे ८९.८७% मतदान- पुडुचेरीच्या ३० विधानसभा जागांवर एकूण १० लाख मतदार आहेत. येथे ८९.८७% मतदान झाले. केंद्रशासित प्रदेशात एकूण दोन जिल्हे आहेत. सर्वाधिक ९०.४७% मतदान पुडुचेरी जिल्ह्यात झाले. तर कराईकलमध्ये ८६.७७% मतदान झाले. पुडुचेरीच्या इतिहासात पहिल्यांदाच इतके मतदान झाले आहे.

आसाममध्ये ५१ वर्षे सत्तेत राहिलेली काँग्रेस, भाजप हॅटट्रिक करण्याच्या प्रयत्नात गेल्या ७६ वर्षांत आसाममध्ये १५ मुख्यमंत्री झाले आहेत. यापैकी सर्वाधिक काळ काँग्रेसचे वर्चस्व राहिले. केरळमध्ये फक्त पिनराई विजयन सलग २ वेळा मुख्यमंत्री झाले. १९५६ मध्ये केरळ राज्याच्या स्थापनेपासून आतापर्यंत राज्यात १२ मुख्यमंत्री झाले आहेत. यापैकी ६ मुख्यमंत्री डाव्या पक्षांचे होते, ज्यांनी ३९ वर्षे सत्ता सांभाळली. तर ४ मुख्यमंत्री काँग्रेसचे झाले, ज्यांनी २८ वर्षे सरकार चालवले.

पुदुच्चेरीमध्ये १० पैकी ७ मुख्यमंत्री काँग्रेसचे होते.१९६३ मध्ये पुदुच्चेरी विधानसभेची स्थापना झाली. तेव्हापासून आतापर्यंत येथे १० मुख्यमंत्री होऊन गेले आहेत.






# शिवसेनेच्या इशाऱ्यानंतर पालिकेला जाग

## वादग्रस्त रूग्णालयाचे तोडले अतिक्रमण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरात गाजत असलेल्या सोनांबेकर हॉस्पिटल प्रकरणाला आता नवा कलाटणी मिळाली असून, रुग्णाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित हॉस्पिटल प्रशासनाविरोधात नगरपालिकेने थेट कारवाईचा बडगा उगारला आहे.



उपचारादरम्यान हलगर्जीपणा केल्याप्रकरणी डॉ. अजिंक्य सोनांबेकर आणि डॉ. अभिजीत कोरडे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर हॉस्पिटलने नगरपालिकेच्या ओपन स्पेसमध्ये अतिक्रमण केल्याचा मुद्दा ऐरणीवर आला होता. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आक्रमक भूमिका घेत तात्काळ अतिक्रमण हटवण्याची मागणी केली होती. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला होता. या इशाऱ्यानंतर नगरपालिकेने तत्काळ ॲक्शन मोडमध्ये जात अतिक्रमण विरोधी पथकाच्या माध्यमातून मोठी कारवाई केली. जेसीबीच्या सहाय्याने ओपन स्पेसमध्ये उभारण्यात आलेली संरक्षक भिंत (कंपाउंड वॉल) तसेच त्यामधील एक खोली अक्षरशः भुईसपाट करण्यात आली. काही वेळातच संपूर्ण जागा मोकळी करण्यात आली.

सकाळच्या सुमारास झालेल्या या धडक कारवाईमुळे शहरात मोठी चर्चा रंगली असून, धनदांडग्यांवरही कायद्याचा हातोडा चालतो असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे. सरकारी जागा बळकावण्याचा हॉस्पिटल प्रशासनाचा प्रयत्न अखेर उधळून लावण्यात आला. दरम्यान गेल्या महिन्याच्या अखेरीस डॉ. अभिजीत कोरडे व डॉ. अजिंक्य सोनांबेकर यांच्या विरोधात संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली होती. संबंधित डॉक्टरांचा प्रभाव लक्षात घेता त्यांच्या अटकेवर राजकीय दबाव असल्याच्या चर्चाही रंगू लागल्या आहेत.

या सर्व घडामोडींमध्ये शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अमर कतारी व शहरप्रमुख अमित चव्हाण यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे व नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांची भेट घेत लेखी निवेदन दिले होते. सर्व्हे नंबर १११/३७ मधील ओपन स्पेस आणि रस्त्यावर झालेले अतिक्रमण त्वरित हटवून ती जागा नागरिकांसाठी खुली करावी, तसेच संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी,

( पान ६ वर)










# ओझर खुर्द येथील नेमबाई देवीच्या डोंगराला आग!



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील ओझर खुर्द येथील नेमबाई देवी डोंगराला बुधवारी (दि. ८) दुपारी भीषण आग लागली. या आगीत डोंगरावरील वनसंपदा जळून खाक झाली असून परिसरातील जैवविविधतेचे मोठे नुकसान झाल्याचा अंदाज स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी २ ते ३ वाजेच्या सुमारास डोंगर पायथ्यापासून धुराचे लोट आकाशात झेपावताना नागरिकांना दिसले. सोशल मीडियावर या धुराचे (आगीचे) व्हिडिओ व्हायरल होताच स्थानिक तरुण आणि ग्रामस्थांनी डोंगराच्या दिशेने धाव घेतली. मात्र, वाऱ्याचा वेग आणि कोरडा पालापाचोळा यामुळे आग वेगाने पसरत गेली.

नागरिकांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, परंतु तोपर्यंत डोंगरावरील लहान-मोठी जंगली झाडे, पालापाचोळा आणि गवत जळून खाक झाले होते. या आगीत केवळ झाडेच नाही, तर डोंगरावर वास्तव्यास असलेल्या पशु-पक्ष्यांची घरटी आणि इतर जैवविविधतेचे देखील नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची पाहणी केली. ही आग नैसर्गिक कारणाने लागली की कुणी जाणीवपूर्वक लावली, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. वनविभागाकडून सध्या या आगीमुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतला जात असला तरी, अंधार आणि इतर अडचणींमुळे पाहणी करण्यात अडथळे येत असल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, उन्हाळ्याच्या दिवसात डोंगराळ भागात वणवा लागण्याच्या घटना वाढत आहेत. अशा घटना रोखण्यासाठी वनविभागाने चोख बंदोबस्त ठेवावा आणि डोंगर परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचा राजीनामा घरात ५०० च्या जळालेल्या नोटा आढळल्या

लखनौ (वार्ताहर)- अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा (५७) यांनी राष्ट्रपतींकडे आपला राजीनामा सादर केला आहे. १४ मार्च २०२५ रोजी त्यांच्या दिल्लीतील घरात लागलेल्या आगीत ५००-५०० रुपयांच्या नोटांचे बंडल जळालेल्या अवस्थेत सापडले होते. या वादामुळे त्यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. त्यांनी ५ एप्रिल २०२५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयात शपथ घेतली होती. मात्र, त्यांना कोणतीही जबाबदारी देण्यात आली नव्हती. त्यांच्याविरुद्ध सुरू असलेली चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना न्यायिक कामांपासून दूर ठेवण्यात आले होते.

रोख रकमेच्या प्रकरणात नाव आल्यानंतर त्यांच्याविरुद्ध लोकसभेत महाभियोग प्रस्ताव आणण्यात आला होता. न्यायमूर्ती वर्मा यांनी त्यांच्याविरुद्ध आणलेल्या महाभियोग प्रस्तावाला आव्हान दिले होते. याचिकेत म्हटले होते की, दोन्ही सभागृहात महाभियोग प्रस्ताव आणला गेला होता, परंतु राज्यसभेने त्याला मंजुरी दिली नाही. असे असूनही, लोकसभेने एकट्याने चौकशी समिती स्थापन केली, जे त्यांच्या मते चुकीचे आहे.

# अदिती राऊतची महाराष्ट्र राज्याच्या क्रिकेट महिला संघात पदार्पण

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिरच्या श्री श्री क्रिकेट अकादमीच्या योग्य मार्गदर्शनाचे फलित

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सुमेरु एज्युकेशन सोसायटी संचलित, श्री श्री रविशंकर विद्यामंदिर संगमनेरच्या 'श्री श्री अकॅडमी'ची उदयोन्मुख खेळाडू अदिती सागर राऊत हिची क्रिकेटच्या मैदानात पुन्हा एकदा उत्तुंग भरारी घेत, १७ वर्षे वयोगटात महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड झाली आहे. अदिती राऊत हिची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) १७ वर्षांखालील मुलींच्या महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे. यापूर्वी तिने वय वर्षे १५ या वयोगटात देखील महाराष्ट्राच्या महिला संघात पदार्पण केले होते. तिच्या या यशामुळे संगमनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. क्षेत्र कोणतेही असो, परंतु त्यामध्ये मुली देखील कुठेही कमी नाहीत, याची प्रचीती आज अदिती ने आणून दिली. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांनीमध्ये क्रीडाक्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक झाला असून,



नवोदित खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली आहे. शाळेने नेहमीच शिक्षणासोबत खेळालाही समान महत्त्व देत, समग्र व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला आहे. तसेच मुलींच्या क्रीडा विकासाला प्रोत्साहन देऊन, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यावर भर दिला जातो.

श्री श्री क्रिकेट अकादमी मधील खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवर (एसजीएफआय) एकूण १७ खेळाडू, तर राज्य पातळीवर एकूण ६० खेळाडूंची निवड झाली आहे. या सर्वांमधून अदितीने आपल्या जिद्दीच्या आणि चिकाटीच्या जोरावर ही निवड सार्थ ठरवत पुढील टप्पा गाठला आहे. या यशामागे तिची सातत्यपूर्ण मेहनत, आत्मविश्वास, खेळावरील निष्ठा व कठोर सराव, त्याबरोबरच अकॅडमी कडून दिले जाणारे फिटनेस ट्रेनींग, कौशल्य विकास, मॅच सिचूशन प्रॅक्टिस, मानसिक स्थैर्य, संघभावना आणि नेतृत्वगुण यांचा समतोल साधणे, याबाबत केले गेलेले मार्गदर्शन याचा मोलाचा वाटा आहे आणि याचेच फलित म्हणून अदिती राऊत हिची १५ वर्षे बरोबरच १७ वर्षे वयोगटात सलग दुसऱ्यांदा निवड झाली आहे. यासोबतच तिला श्री श्री रविशंकर विद्यामंदिर क्रिकेट अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक योगेश खरात, तसेच आदिप वाघ, अभिषेक कदम आणि प्रथमेश हासे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षकांनी दिलेल्या तंत्रशुद्ध प्रशिक्षणा मुळेच अदितीने राज्य पातळीवर आपली छाप पाडली आहे. अदिती मधील क्रिकेट विषयीचे कौशल्य आणि मेहनत करण्याची क्षमता ओळखून, त्यांनी तिचा सराव, आहार तसेच मानसिक व शारीरिक स्वास्थ्य याविषयी सतत मार्गदर्शन करत राहिले. सिधदकला आयुर्वेदिक महाविद्यालयाचे ट्रस्टी श्री नैमेश सराफ यांचे मोलाचे सहकार्य आमच्या सर्वच खेळाडूंना वेळोवेळी मिळत असते.

अदितीच्या या यशाबद्दल सुमेरु एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापिका स्वाती शाह, सचिव समीर शाह, मुख्याध्यापक आरती सप्रा, उपमुख्याध्यापिका सौ. ज्योर्तिमया चव्हाण, सर्व शिक्षक, क्रीडाप्रेमी आणि ग्रामस्थांकडून तिचे व तिच्या प्रशिक्षकांचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. आगामी काळात महाराष्ट्र संघाकडून खेळताना अदिती उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

# मंजूर विकासकामांबाबत प्रशासनाविरोधात भाजपा आक्रमक

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर शहरातील विविध प्रभागांमध्ये शासनामार्फत मंजूर करण्यात आलेली विकासकामे अद्याप सुरू न झाल्यामुळे भारतीय जनता पार्टी, संगमनेर शहर मंडळ आक्रमक झाले असून, तात्काळ कामे सुरू न केल्यास रस्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय जनता पार्टी, संगमनेर शहर मंडळाच्या वतीने शहर अध्यक्षा सौ. पायल ताई ताजने यांच्या नेतृत्वाखाली आज संगमनेर नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, विशेष रस्ता अनुदान २०२५-२०२६ या योजनेअंतर्गत संगमनेर शहरातील रस्ते काँक्रिटीकरण, डांबरीकरण व इतर नागरी सुविधा यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. पालकमंत्री मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विद्यमान आमदार मा. अमोलभाऊ खताळ पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून निधी मंजूर झालेला असताना, संबंधित कामांना अद्याप सुरुवात न होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे नमूद करण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, कामांमध्ये होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील अनेक रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असून, धुळीचे प्रमाण वाढले आहे. वाहतुकीत अडथळे निर्माण होत असून, अपघातांचा धोका वाढला आहे. यासोबतच अनेक ठिकाणी स्ट्रीट लाईट नसल्यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. भाजपच्या वतीने प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा देण्यात आला आहे की, मंजूर विकासकामे तात्काळ सुरू करून ती निश्चित कालावधीत पूर्ण करावीत. तसेच शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर आवश्यक त्या ठिकाणी स्ट्रीट लाईट बसविण्याची तात्काळ कार्यवाही करावी व कामांचा सविस्तर आराखडा जाहीर करावा. अन्यथा, भारतीय जनता पार्टी, संगमनेर शहर मंडळाच्या वतीने नागरिकांच्या हक्कांसाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असून, उद्भवणाऱ्या सर्व परिस्थितीस प्रशासन पूर्णपणे जबाबदार राहील, असा कडक इशारा यावेळी देण्यात आला.

या निवेदनावेळी ज्योतीताई भोर, अंजली शिंदे, नीता मोहरीकर, भारत गवळी, शुभम लहामगे, विशाल एनगंदुल, दिलीप रावल, सिताराम मोहरीकर, प्रवीण करपे, अरुण कुलकर्णी, शिवकुमार भंगीरे, आकाश सहाणे, अविनाश फटांगरे, प्रकाश राठी, सागर भोईर, जग्गू शिंदे, भगवान कुक्कर, संतोष पठाडे, राजेश वाकचौरे, दिलीप शेटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संगमनेर शहरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी भाजप रस्त्यावर उतरून लढा देणार असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# आमच्या प्रेमळ मोठ्याई

# सखुबाई पानसरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली...

**मोठ्याई म्हणजे मायेची ऊब,**
**आईसारखी जपणारी,**
**नातं वेगळं असलं तरी,**
**मनाने आईच ठरणारी।**

**मोठ्याई म्हणजे गंगेचा प्रवाह,**
**निर्मळ, पवित्र, अखंड,**
**तिच्या सान्निध्यात राहता,**
**हरपतो जीवनाचा दाह मंद।**

**मोठ्याई म्हणजे वडाची सावली,**
**उन्हातही थंडगार,**
**तिच्या छायेखाली जगताना,**
**दु:ख होते हलके भार।**

**मोठ्याई म्हणजे आभाळ विशाल,**
**मायेचे अथांग दान,**
**स्वत:च्या वेदना दडवून,**
**देते प्रेमाचं वरदान।**

**मोठ्याई म्हणजे आधार ह्रदयाचा,**
**नि:शब्द पण ठाम,**
**तिच्या सहवासात लाभे,**
**जीवनाला नवा ध्यास आणि नाम।**

**मोठ्याई म्हणजे मातीचा सुगंध,**
**आठवणींनी दरवळणारा,**
**तिच्या प्रत्येक शब्दात होता,**
**जिव्हाळा प्रेमाचा झरणारा।**

आमच्या मोठ्या चुलती म्हणजे सौ. सखुबाई बाळासाहेब पानसरे आमच्या पानसरे कुटुंबात आलेल्या सर्वात मोठ्या सूनबाई. असे म्हणतात की, देवाचे नियोजन असे असते की, घरात जी मोठी सुनबाई येते ती निश्चितच प्रेमळ, शिस्तप्रिय, सगळ्यांना धरून राहणारी अशीच असते. ती संपूर्ण कुटुंबाला प्रेमाने धरून ठेवते हे अगदी खरे आहे.

आमची चुलती म्हणजे आमची काकू. मोठ्याई शब्दाच्या खऱ्या अर्थाने वयाने, विचाराने आणि मनाने मोठी. मुले जरी तिला अक्का म्हणायचे तरी आम्ही तिला मोठ्याई म्हणायचो. कारण संपूर्ण कुटुंबाला धरून ठेवणारी आमची मोठ्याई भेटली की, भाऊ चहा, दूध घेऊन जा. शेंगा घेऊन जा बोलायच्या. अण्णा, लहान भाऊ या सगळ्यांचे काय चालले आहे, नम्रता कुठे आहे, काय चालले आहे अशी प्रेमाने विचारपूस करायची. मोठ्या आईकडे आमचे पूर्वी तर नेहमी जाणे-येणे असायचे. पण आता जरा क्वचितच भेटल्यावर ती माझ्या बायकोच्या नम्रताच्या गळ्यातच पडायची. विनम्र काय करतो, कुहू कशी आहे, अशी मायेने चौकशी करायची. बाई नेहमी फिरतानी भेटल्यावर तिच्याकडे शेतातील वानोळा आठवणीने द्यायची. ती फक्त नातवंडांनाच नाही तर सुनांना त्याच प्रेमाने वागवायची, भेटल्यावर तिला किती बोलू आणि किती नाही असे व्हायचे. घरासमोरून कधी चालत गेलो तरी ती घरी चला, घरी चला असा तिचा खूप आग्रह असायचा.

बोलायची सुरुवात झाली की तिच्या तोंडून फक्त तिचे नातवंडे, तिच्या सुना, तिच्या मुली, तिचे मुले यांचे इतके प्रेमाने व इतके तोंड भरून कौतुक सांगत राहणार. माझा राजू असा, माझा जालूभाऊ असा, माझा मच्छू असा, माझी मंदा, शोभा अशी म्हणजे इतके प्रेमाने ती त्यामध्ये रमून जायची.

त्यांचं कुटुंब आणि त्यांच्यात असणारे प्रेम हे मी पाहिले आहे. आज न्यूक्लिअरच्या युगात दोन भाऊ एकत्र राहत नाहीत. प्रत्येक भाऊ वेगवेगळे बंगले बांधून वेगवेगळे राहतात. अशा या वातावरणात आमची मोठी आई आणि आमचे परमपूज्य मोठे बाबा यांनी त्यांचे कुटुंब एक संघ ठेवले. याचा मला सार्थ अभिमान आहे. याचे कारण आमची मोठी आई आहे.

मोठ्या आईच्या नातवंडांबद्दल बोलायचे झाले तर आकाश, अभी, स्वप्निल, आर्या, पुजा ही मोठ्या आईच्या आजारपणाविषयी कळल्यावर खूप रडले. नातवंडांचे आजीवरील प्रेम पाहून मीही भावूक झालो.

आकाशने तर आजीसाठी खूप प्रचंड धावपळ केलेली मी पाहिले आजीसाठी काय करू आणि काय नाही असे या नातवंडांना झाले होते. स्वप्निलने तर हात पायाच गाळून टाकले होते. तर अशी इतकी प्रेमळ आजी आणि नातवंडे यांचे इतके प्रेम, त्याच्यातील एवढा स्नेह निर्माण व्हायला त्याची आजी किती प्रेमळ असेल याचा अंदाज तुम्हाला येऊ शकतो.

आज मोठ्या आई आमच्यातून गेली. पण तिच्या आठवणीची शिदोरी तिचा प्रेमळपणा, तिचे वात्सल्य, तिची सात्विकता, तिची कुटुंब एक संघ ठेवण्याचा प्रयत्न हे गुण निश्चितच वाखण्याजोगे आहेत. खांडेश्वर चे वर्पे कुटुंबातील माहेर असणाऱ्या आमच्या मोठ्या आई पानसरे कुटुंबाच्या मातोश्री आमचे मोठे बाबा यांना आयुष्यात नितांत साथ देणारी पत्नी तीला भावपूर्ण आदरांजली.

**शब्दांकन**
**डॉ. विक्रम मारुती पानसरे**
**(पुतणे)**



संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि
उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# मेंगाळवाडी गावची कोमल किसन भुतांबरे यांची पोलीस खात्यात निवड

## माजी मंत्री बाळासाहेब थोरातांकडून सत्कार



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील मेंगाळवाडी या आदिवासी ठाकरवाडीतील कोमल किसन भुतांबरे यांची नुकतीच पोलीस खात्यात निवड झाली असून, तालुका व मेंगाळवाडी गावासाठी अभिमानास्पद गोष्ट असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. पुणे जिल्हा पोलीस मध्ये निवड झाल्याबद्दल सौ. कोमल व त्यांचे पती किसन सुभाष भुतांबरे यांचा सत्कार लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, अजय फटांगरे, बाळकृष्ण गांडाळ, राजाराम भूतांबरे, सुभाष भुतांबरे, जनाबाई भूतांबरे, किसन भुतांबरे, सागर भुतांबरे, मेंगाळवाडीतील नागरिक उपस्थित होते.

यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, विस्ताराने मोठ्या असलेल्या संगमनेर तालुक्याने कायमच प्रतिकूल परिस्थितीत मात करत आपला विकास साधला आहे. मेंगाळवाडी या आदिवासी ठाकरवाडीतील सौ. कोमल किसन भुतांबरे यांची पुणे जिल्हा पोलीस मध्ये झालेली निवड ही नक्कीच तालुका व मेंगाळवाडी गावासाठी अभिमानास्पद बाब आहे. यातून इतर विद्यार्थ्यांनीही आदर्श घेत स्पर्धा परीक्षा व इतरही महत्त्वाच्या परीक्षा जिद्दीने द्याव्यात. अपयशाची भीती न बाळगता प्रामाणिक प्रयत्न करावे, असेही ते म्हणाले.

बाळकृष्ण गांडाळ म्हणाले की, कोमल भुतांबरे यांची पोलिस दलात निवड म्हणजे तमाम आदिवासी समाजासाठी अभिमानाची बाब आहे. कोमल ने मिळविलेल्या यशाबद्दल आदिवासी बांधवांच्या वतीने तिचे मनापासून अभिनंदन, व तिच्या कडून सर्वसामान्य आदिवासी गोरगरिबांची सेवा व्हावी, असेही ते म्हणाले.

कोमल भुतांबरे यांचे मेंगाळवाडी गावातील माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे कट्टर समर्थक असलेल्या जेष्ठ कार्यकर्ते राजाराम गणपत भुतांबरे यांचे नातू किसन सुभाष भुतांबरे यांच्याशी लग्न झाले. पती व पत्नीने चिकाटी व जिद्द कायम ठेवत अकॅडमी मध्ये प्रॅक्टिस करत राहिले. आणि याचाच परिणाम म्हणून सौ. कोमल, तिची पुणे जिल्हा पोलीस मध्ये निवड झाली आहे. कोमल किसन भूतांबरेच्या या निवडीबद्दल तालुक्यातील सर्व स्तरावरून अभिनंदन होत आहे.

# कळसुबाई शिखरावर सुविधा व वनसंवर्धनासाठी उपाययोजनांची मागणी

घोटी (युवावार्ता प्रतिनिधी)-

नाशिक व नगर जिल्ह्यांच्या सीमेवरील महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसुबाई शिखरावर भाविक व पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच, वन्यजीव संरक्षण व पर्यावरण संवर्धनासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी कळसुबाई मित्र मंडळाने केली आहे. या संदर्भात मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भागीरथ मराडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी वनमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असून, लवकरच सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



गेल्या तीन दशकांपासून कळसुबाई मातेच्या सेवेत कार्यरत असलेल्या गिर्यारोहकांनी निवेदनात नमूद केले की, कळसुबाई शिखर हे धार्मिक, नैसर्गिक व पर्यटनदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे स्थळ असून, दरवर्षी लाखो भाविक व पर्यटक येथे भेट देतात. मात्र, अलीकडील काळात प्लास्टिक कचरा, पाण्याच्या बाटल्या व अन्नपदार्थांचे अवशेष यामुळे परिसरात अस्वच्छता वाढत असून, पर्यावरणीय समतोल व जैवविविधतेला धोका निर्माण होत आहे.

तसेच, स्वच्छता सुविधा, कचरा व्यवस्थापन, नियंत्रण यंत्रणा व जनजागृतीच्या अभावामुळे ही समस्या गंभीर होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे : - कळसुबाई परिसरात नियमित कचरा संकलन व व्यवस्थापनासाठी विशेष यंत्रणा उभारावी, व प्लास्टिक वापरावर कडक निर्बंध लावावेत. भाविकांसाठी सावली शेड, स्वच्छतागृहे व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी; तसेच सूचना फलक लावावेत. कळसुबाई, अलंग, मदन, कुलंग परिसरात वनौषधी व फळझाडांची मोठ्या प्रमाणात लागवड करावी. कळसुबाई मातेच्या मंदिराचा जीर्णोद्धार करून परिसराचे सुशोभीकरण करावे. बारीगाव मार्गे असलेल्या जीर्ण लोखंडी शिड्या बदलून दुहेरी (ये-जा) व्यवस्था तातडीने उभारावी. इंदोरे गावातून माकड कड्यावरून जाणारा प्राचीन मार्ग पुन्हा सुरू करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

या उपाययोजना तातडीने राबविल्यास कळसुबाई शिखराचे नैसर्गिक सौंदर्य अबाधित राहील, पर्यावरण संवर्धनाला चालना मिळेल, तसेच स्थानिकांना रोजगाराच्या संधीही निर्माण होतील, असा विश्वास मंडळाने व्यक्त केला. या वेळी अनिल भोपे, कैलास कडू, प्रवीन भटाटे, महेंद्र आडोळे, विकास शेंडगे, निलेश पवार आदी उपस्थित होते.

# उंचखडक बु. सारख्या शाळा सर्वत्र व्हाव्यात - डॉ. मैथिली तांबे

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

गेल्या दोन वर्षापुर्वी बंद पडलेली उंचखडक बु येथील जिल्हा परिषदेची शाळा आज सामाजिक, आर्थिक, भौतिक व गुणवत्तेच्या दृष्टीने सर्वगुणसंपन्न झाली आहे. शुन्य ते ७० पटाचा प्रवास, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, प्रथम क्रमांक, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासाठी निवड, आयएसओ मानांकन, पहिल्याच प्रयत्नात नवोदय विद्यालयासाठी व सैनिक स्कुलसाठी दोन विद्यार्थ्यांची निवड, विज्ञान प्रदर्शन व स्कॉलरशिप तसेच सांस्कृतीक व क्रिडा स्पर्धेत प्रथम क्रमांक, अशा विविध स्पर्धेमध्ये उल्लेखनिय कामगिरी केली आहे. उंचखडक बुद्रुक सारख्या जिल्हा परिषदेच्या शाळा सर्वत्र व्हाव्यात, असे प्रतिपादन संगमनेराच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे यांनी केले.

तालुक्यातील उंचखडक बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेच्या विविध गुणदर्शन सोहळ्याच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपिठावर क्लासवन अधिकारी प्रा. अरुण भांगरे, रिपाईचे राज्यसचिव विजय वाकचौरे, ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब मंडलिक, रोटरी क्लबचे सहा. प्रांतपाल अमोल वैद्य, शिक्षणतज्ञ भाऊसाहेब चासकर, कळसचे सरपंच राजेंद्र गवांदे, अमृत उद्योग समूहाचे जनसंपर्क अधिकारी नामदेव कहांडळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. सागर शिंदे, आदी उपस्थित होते. या कार्यक्रामाचे अध्यक्षस्थानी भाऊमामा खरात होते.

यावेळी डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, शाळा चालविण्यासाठी चार स्तंभ असणे आवश्यक असते. त्यात मुख्याध्यापक, पालक, प्रशासन आणि सक्षम शाळा व्यवस्थापन समिती, हे सर्व स्तंभ उंचखडक बुद्रुक शाळेला लाभले. म्हणून तर एक बंद पडलेली शाळा राज्याच्या आणि देशाच्या पटलावर जाऊ शकली आहे. उंचखडक बुद्रुक हे



गाव छोटे असेल, तरी शेतकरी दृष्ट्या सदन आहे. तरी देखील येथील पालकांनी शाळेवर विश्वास टाकला असून, मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेत पाठविले आहे. याच शाळेचे तीन माजी विद्यार्थी नुकतेच क्लासवन अधिकारी झाले असून, त्यांचा येथे सत्कार करण्यात आला आहे. माझ्या माहितीनुसार इयत्ता पाचवीचा वर्ग याच वर्षी सुरू झाला आहे. त्यात २६ विद्यार्थी शिक्षण घेत असून, अकोले तालुक्यातील अधिकार्यांची मुले शहराच्या ठिकाणाहून ग्रामीण भागात शाळेत येतात, ही फार मोठी कौतुकाची बाब आहे. विशेष म्हणजे पहिल्याच प्रयत्नात सामान्य कुटुंबातील विद्यार्थी नवोदय आणि सैनिक स्कुलसाठी निवडली जातात, यापेक्षा अधिक काय गुणवत्ता सिद्ध करावी. त्यामुळे, उंचखडक बुद्रुक शाळेसारख्या सगळीकडे शाळा झाल्या पाहिजे, म्हणजे सामान्य कुटुंबातील मुलांना देखील गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळु शकेल, असेही सौ. तांबे यांनी नमूद केले.

यावेळी क्लासवन अधिकारी प्रा. अरुण भांगरे, अभिजित देशमुख, सुरेश मंडलिक, श्रीकांत मंडलिक, यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नवोदय विद्यालयासाठी निवड झालेली स्वरा शिंदे व निशिता बोराडे, तसेच मिशन आरंभमधील पात्र विद्यार्थी सम्यक तपासे, सैनिक स्कुलसाठी निवड झालेला सोहम खोकले, यांच्यासह काही विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच उंचखडक बु येथील शाळा उभी करण्यासाठी ज्या शिक्षकांनी मेहनत घेतली, असे रवि रुपवते, काळु तपासे, विक्रम गायकर, गोविंद खोकले, केंद्रप्रमुख बडे, यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अगस्ती कारखान्याचे माजी संचालक भाऊसाहेब खरात, भाऊसाहेब देशमुख, श्यामराव देशमुख, सागर देशमुख, तुषार देशमुख, अमोल शिंदे, विकास खरात, संदेश खरात, महेश खरात, महेश जेजुरकर, प्रतिक मंडलिक, अजय खरात, विशाल देशमुख, सोपानराव देशमुख, आबासाहेब मंडलिक, उपाध्यक्षा मनिषाताई देशमुख, श्रीमती घुले, श्रीमती क्षिरसागर, श्रीमती बडे, शितलताई देशमुख, हर्षदाताई देशमुख, यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती क्षिरसागर व काळु तपासे यांनी केले, तर आभार भाऊसाहेब खरात यांनी मानले.

# धरण परिसरात पर्यटन विकासाला प्राधान्य - जलसंपदा मंत्री डॉ. विखे

शिर्डी (जिल्हा माहिती अधिकारी)-

पर्यटनाला चालना देण्यासाठी जलसंपदा विभागाने धरण परिसराच्या विकासाला प्राधान्य दिले असून, या संदर्भातील काम सुरू झाले आहे. जायकवाडी, माजलगाव, इसापूर या धरणांसह अहिल्यानगर जिल्ह्यातील निळवंडे व भंडारदरा परिसरात पर्यटन केंद्रे विकसित करून रोजगार निर्मितीवर भर देण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे डॉ. विखे पाटील यांनी स्वागत केले. यावेळी पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे उपस्थित होते. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी धरण पर्यटनासंदर्भातील धोरणाची माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने धरण परिसरातील जलसंपदा विभागाच्या जागांचा उपयोग पर्यटन विकास केंद्रांसाठी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासाठी एक निश्चित धोरण तयार करण्यात आले असून, बहुराष्ट्रीय कंपन्या याकामी सल्लागार म्हणून काम पाहणार आहेत. गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून पर्यटन विकासाचे काम सुरू करण्यात आले आहे.

महामंडळासाठी आर्थिक स्रोत निर्माण व्हावेत तसेच स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध व्हावा, हा यामागील मुख्य उद्देश आहे. नवीन धोरणानुसार वॉटर स्पोर्ट्स व रिसॉर्ट्स उभारून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सुयोग्य नियोजन करण्यात आल्याचेही

# अकरावी प्रवेश वेळापत्रक जाहीर

मुंबई (प्रतिनिधी)-

शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील इयत्ता ११ हावी, केंद्रीय ऑनलाईन प्रवेश शुक्रियेद्वारे विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरण्यास १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरुवात करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग १ भरून नोंदणी करता येणार आहे. तर प्रवेश क्षर्जाचा भाग-२ भरण्याची सुविधा राज्य मंडळाचा दहावीचा निकाल जाहीर कास्तियानंतर उपलब्ध करुन वेपबात येणार असल्याचे शिक्षण संचालनालयाकडून जाहीर करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यीनी इज ऑफ लिविंग या कार्यक्रमांतर्गत इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात राबविण्याचा विषय गतवर्षी घेतला आहे. त्यानुसार २०२५-२६ पासून राज्यातील उच्च माध्यमिक

विद्यालयांमध्ये इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्यात येत आहेत. २०२५-२६ मध्ये अनेक अडचणींचा सामना करत अकरावी प्रवेश प्रक्रिया पार पडली होती. यंदा अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी राज्य मंडळाने तयारी सुरू केली आहे. त्यानुसार दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी अर्जाचा भाग १ भरण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून विद्यार्थ्यांना /https://mahafvicadmissions.in संकेतस्थळावर अर्जाचा भाग १ भरण्याची सुर्विधा उपलब्ध करण्यात येणार आहे प्रवेश अर्जाचा भाग-२ भरण्याची सुविधा राज्य मंडळाचा दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर उपलब्ध करण्यात येणार असल्याचे शिक्षण संचालनालयाकडून जाहीर करण्यात आले आहे.

शिक्षण संबालनालयाकडून महत्त्वाच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्य मंडळाशी संलग्न सर्व उच्च माध्यमिक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारेच अर्ज करणे आवश्यक आहे. अन्य मंडळांच्या शाळांमध्ये इयत्ता ११ वीला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित मंडळाच्या शाळांशी थेट संपर्क साधावा. अन्य मंडळांतून इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना राज्य मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वीला प्रवेश घ्यायचा असल्यास त्यांनाही ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे. प्रवेश प्रक्रिया ही गुणवत्तेनुसार आणि निर्धारित निकषांच्या आधारावरच राबविण्यात येणार असून, शेवटच्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे. ऑनलाईन प्रणालीशिवाय अन्य कोणत्याही मार्गाने प्रवेश दिले जाणार नाही. अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. या संकेतस्थळावर राज्यातील इयत्ता ११ वीचे वर्ग असलेली महाविद्यालये, उपलब्ध शाखा, माध्यमांची माहिती, प्रवेश क्षमता व रिक्त जागा यांचा सविस्तर तपशील उपलब्ध केला जाणार आहे.

# शहरविस्तार आणि पाण्याची लढाई...

भारतामध्ये शहरांची वाढ ही विकासाचे प्रतीक मानली जाते; मात्र ही वाढ जर अनियंत्रित आणि अव्यवस्थित असेल, तर ती भविष्यातील गंभीर संकटांची जननी ठरू शकते. आज जगभरात विशेषतः आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील देशांमध्ये शहरांचा झपाट्याने विस्तार होत आहे. या विस्ताराचा परिणाम केवळ आर्थिक किंवा भौतिक स्वरूपावर मर्यादित राहत नाही, तर तो जीवनाच्या मूलभूत गरजांवरही खोलवर परिणाम करतो. त्यामध्ये पाणी ही सर्वात महत्त्वाची गरज असून, तिच्याशी संबंधित संकट दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालले आहे. २०५० पर्यंत ग्लोबल साउथमधील कोट्यवधी लोकांना पाणी उपलब्ध होणार नाही, असा इशारा अलीकडील अभ्यासांमधून समोर येत आहे. हा केवळ आकड्यांचा इशारा नसून, तो मानवी अस्तित्वावर घोंगावणारा गंभीर धोका आहे.

भारतातील शहरांची रचना पाहिली, तर एक वेगळीच विसंगती दिसून येते. एका बाजूला शहरांच्या मध्यवर्ती भागात अतिशय दाट लोकवस्ती असून उंच इमारतींचे जंगल उभे राहत आहे, तर दुसऱ्या बाजूला शहरांच्या कडेला जलद गतीने पण विस्कळीत आणि कमी घनतेचा विस्तार होत आहे. ही दुहेरी रचना शहरांच्या पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण आणते. पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, जलनिःसारण यांसारख्या सुविधा या दोन्ही टोकांच्या परिस्थितीत प्रभावीपणे कार्य करू शकत नाहीत. परिणामी, पाण्याची



कमतरता ही केवळ तात्पुरती अडचण न राहता ती दीर्घकालीन संकटाचे रूप धारण करते.

मुंबईसारख्या महानगरात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक असूनही पाणीपुरवठ्यात तफावत दिसून येते. शहराच्या गरजेच्या तुलनेत दररोज मोठ्या प्रमाणावर पाणी कमी पडते. यामुळे काही भागात २४ तास पाणी उपलब्ध असताना अनेक भागांमध्ये केवळ काही तासच पाणीपुरवठा होतो. ही विषमता केवळ व्यवस्थापनातील त्रुटी दाखवत नाही, तर ती सामाजिक असमानतेलाही अधोरेखित करते. झोपडपट्टीतील नागरिकांना कमी पाणी मिळते, पण त्यासाठी त्यांना जास्त पैसे मोजावे लागतात, ही परिस्थिती अधिकच चिंताजनक आहे.

शहरांच्या बाह्य भागात निर्माण होणाऱ्या वस्त्यांमध्ये परिस्थिती आणखी गंभीर आहे. येथे औपचारिक पाणीपुरवठा व्यवस्था पोहोचत नाही किंवा ती अपुरी पडते. त्यामुळे नागरिकांना बोअरवेल, खासगी टँकर किंवा अनौपचारिक स्त्रोतांवर अवलंबून राहावे लागते. यामुळे भूजलाचा अतिरेकाने उपसा होतो आणि पाण्याची पातळी झपाट्याने खाली जाते. याचबरोबर, भूजलाचे प्रदूषणही वाढते. दिल्ली, बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद यांसारख्या शहरांमध्ये ही समस्या प्रकर्षाने दिसून येते. काही ठिकाणी भूजलामध्ये हानिकारक घटकांचे प्रमाण वाढल्याने आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

चेन्नईमध्ये काही वर्षांपूर्वी आलेले 'डे झिरो' संकट हे या अनियोजित शहरीकरणाचे ज्वलंत उदाहरण आहे. शहरातील जलाशय कोरडे पडले, पाणथळ जागांवर अतिक्रमण झाले आणि परिणामी संपूर्ण शहराला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागला. बेंगळुरूमध्ये पारंपरिक तलाव व्यवस्था नष्ट होत असल्याने पाण्याचे नैसर्गिक साठवण तुटले आहे. मुंबईत खारफुटी भाग कमी होत असल्याने पूर आणि पाणी व्यवस्थापनाचे प्रश्न निर्माण होत आहेत. या सर्व घटनांमधून एकच संदेश स्पष्टपणे मिळतो की, पर्यावरणीय संसाधनांकडे दुर्लक्ष करून केलेला विकास हा दीर्घकालीन संकटांना आमंत्रण देतो.

शहरांच्या वाढीचा विचार करताना केवळ नवीन बांधकामे किंवा विस्तार यावर भर देणे अपुरे आहे. त्याऐवजी विद्यमान शहरांच्या आतल्या भागाचा सुयोग्य विकास करणे अधिक आवश्यक आहे. जुन्या भागांमध्ये कमी वापरात असलेल्या जमिनींचा पुनर्विकास केल्यास नवीन पायाभूत सुविधांवरील ताण कमी होऊ शकतो. तसेच, पाण्याच्या स्त्रोतांचे संरक्षण आणि पुनर्संचयन करणे अत्यावश्यक आहे. तलाव, पाणथळ जागा, खारफुटी क्षेत्रे ही केवळ पर्यावरणीय घटक नसून, ती शहरांच्या जलव्यवस्थेची आधारस्तंभ आहेत.

शेवटी, शहरांच्या भविष्यासाठी आज घेतले जाणारे निर्णय निर्णायक ठरणार आहेत. जर शहरांचा विस्तार अनियंत्रितपणे सुरू राहिला, तर येत्या काळात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होईल आणि त्याचा फटका लाखो नागरिकांना बसणार आहे. मात्र, जर नियोजनबद्ध, पर्यावरणपूरक आणि समावेशक विकासाचा मार्ग स्वीकारला, तर हे संकट टाळता येऊ शकते. पाणी ही केवळ एक संसाधन नसून, ती जीवनाची मूलभूत गरज आहे. तिचे योग्य व्यवस्थापन हेच खऱ्या अर्थाने शाश्वत विकासाचे द्योतक ठरेल.

# कै. भास्करराव मारूती सिनारे यांना

## चिखली गावच्या विकासाचा महामेरू....

चिखली गावच्या मातीतील एक तेजस्वी तारा आणि समाजसेवेचा ध्यास घेतलेले व्यक्तिमत्व, आदरणीय भास्करराव मारुती पाटील सिनारे आज आपल्यात नाहीत, त्यांच्या कर्तृत्वाचा सुगंध या मातीत कायम दरवळत राहील. निस्वार्थी सेवा आणि जनसामान्यांच्या कल्याणासाठी समर्पित असलेले त्यांचे जीवन म्हणजे चिखली गावाच्या प्रगतीचा एक सुवर्णकाळ ठरला आहे.

**समाजसेवेचा ध्यास आणि विकासाची वाट -**

भास्कररावांनी केवळ स्वप्ने पाहिली नाहीत, तर ती सत्यात उतरवण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले. बहिणी भाचे नातेवाईक यांना येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करण्यासाठी नेहमी ते तत्पर असायचे. त्याचबरोबर गावच्या ग्रामपंचायतीपासून ते 'छत्रपती दूध संस्था' आणि 'राजहंस दूध संघा'च्या माध्यमातून त्यांनी सहकार क्षेत्राला एक नवी दिशा दिली. शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या जीवनात उजेडाचा दिवा लावणारा हा लोकनेता खऱ्या अर्थाने गावचा आधारस्तंभ होता.

**माणुसकीचा आणि विश्वाचा स्तंभ -**

जात-पात भेद न मानता, सर्वांना देईल मान हे त्यांच्या जीवनाचे ब्रीदवाक्य होते. समाजातील प्रत्येक स्तरातील माणसाला त्यांनी सन्मानाने वागवले. गरिबांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे आणि संकटात सापडलेल्यांना मदतीचा हात देणे, यातच त्यांना खरा आनंद मिळायचा. त्यांच्या निःस्वार्थी कार्यामुळेच आज चिखली गावाची ओळख एक प्रगत गाव म्हणून होत आहे. कर्तृत्वाचा हिमालय आणि अखंड सेवा स्वार्थाचा एक कणही मनात न ठेवता, शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी विकासाचा प्रवास सुरू ठेवला. प्रेम, माया आणि आपल्या अफाट कर्तृत्वाने त्यांनी केवळ गावाचा कायापालट केला नाही, तर लोकांच्या मनावरही अधिराज्य गाजवले. त्यांच्या कार्याची वाहती गंगा त्यांनी कधीच खंडित होऊ दिली नाही.

**अमर कार्य आणि आठवणी -**

आज जरी भास्करराव आपल्यात शारीरिक रूपाने नसले, तरी चिखलीच्या कणाकणात त्यांच्या आठवणी जिवंत आहेत. त्यांच्या गौरवशाली कार्याची गाथा येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. विकासाचा हा 'महामेरू' अनंत काळापर्यंत स्मरणात राहील. सर्व नातेवाईक मित्रमंडळी व चिखली ग्रामस्थांच्या वतीने आणि तमाम हितचिंतकांतर्फे या महान लोकनेत्याला भावपूर्ण श्रद्धांजली!

**शब्दांकन:**
**प्रा. डॉ.किशोर रंगनाथ डोंगरे**

## अभ्यासू राजकीय व्यक्तिमत्व हरपले...

आपल्या चिखली गावचे ज्येष्ठ व अभ्यासू राजकीय व्यक्तिमत्त्व, लोकनेते मा. बाळासाहेब थोरात साहेब यांचे एकनिष्ठ सहकारी, मा. भास्करराव मारुती सिनारे पाटील यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले ही अत्यंत दुःखद घटना आहे.

भास्कररावांच्या रूपाने चिखली गावाने एक अभ्यासू, विकासाभिमुख आणि जनतेशी नाळ जोडलेले नेतृत्व गमावले आहे. गेली पंधरा वर्षे राजहंस दूध संघाचे संचालक, काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते तसेच लोकनेते बाळासाहेब थोरात साहेबांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. चिखली गावचे सरपंच म्हणूनही त्यांनी काम पाहिले आणि गेल्या वीस पंचवीस वर्षापासून ग्रामपंचायतीवर प्रभावी नेतृत्व केले.

छत्रपती दूध संस्थेवरही त्यांची अनेक वर्षे सत्ता राहिली. गावच्या राजकारणात अनेकदा विरोध झाला, अनेकांनी साथ दिली, अनेकांनी मतभेदही मांडले, पण भास्कररावांनी नेहमीच सर्व गोष्टी समजून घेत विकासकामांना प्राधान्य दिले. गोरगरिबांना मदत करणारे लोकांशी जिव्हाळ्याने वागणारे, शांतपणे पण ठामपणे निर्णय घेणारे आणि अभ्यासू दृष्टिकोन ठेवणारे असे व्यक्तिमत्त्व आज आपल्यात नाही, ही गावासाठी मोठी हानी आहे.

त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली...

**– सागर हासे, चिखली**

## समाजकारणातील एक 'अजातशत्रू' नेतृत्व

संगमनेर तालुक्यातील चिखली गावचे माजी सरपंच, सहकार क्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व आणि आमदार बाळासाहेब थोरात यांचे खंदे समर्थक भास्कर मारुती सिनारे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनामुळे चिखली गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण संगमनेर तालुक्यातून हळहळ व्यक्त होत आहे. एक अभ्यासू, संयमी आणि लोकाभिमुख नेतृत्व हरपल्याची भावना सर्वत्र उमटत आहे.

**निष्ठेचे प्रतीक अन् शब्दांचे पक्के,**
**थोरातांच्या विचारांचे खंदे समर्थक...**
**सहकार अन् समाजकारणाचा,**
**ते होते एक आदर्श मार्गदर्शक...**

१ जून १९६२ रोजी जन्मलेल्या भास्कर मारुती सिनारे यांनी १२ वी सायन्सपर्यंतचे शिक्षण घेतले होते. सरपंच पदाच्या प्रदीर्घ कार्यकाळात त्यांनी चिखली गावाचा कायापलट केला. गावात शुद्ध पिण्याच्या पाण्याची योजना राबवणे, वाड्या - वस्त्यांवर पक्क्या रस्त्यांचे जाळे विणणे आणि जिल्हा परिषद शाळेच्या डिजिटलायझेशनसाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच चिखली गावाने विकासाच्या बाबतीत तालुक्यात वेगळी ओळख निर्माण केली.

केवळ ग्रामपंचायतच नव्हे, तर सहकार क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. चिखली सहकारी दूध संस्थेचे तब्बल १८ वर्षे संचालक आणि अध्यक्ष म्हणून त्यांनी धुरा सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात दूध उत्पादकांना योग्य दर मिळवून देणे, संस्थेचा पारदर्शक कारभार आणि तांत्रिक सुधारणा करून संस्थेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या निधनाने सहकार क्षेत्रातील एक मार्गदर्शक हरपला आहे.

भास्कर सिनारे हे केवळ एक नेते नव्हते, तर ते ग्रामस्थांचे कौटुंबिक आधारवड होते. दुष्काळ असो वा कोरोनासारखे जागतिक संकट, त्यांनी नेहमीच स्वतःहून पुढाकार घेऊन गोरगरिबांना मदत केली. अडल्या-नडल्यांच्या लग्नाकार्यात किंवा वैद्यकीय मदतीसाठी ते सदैव तत्पर असत. 'अजातशत्रू' या शब्दाचा प्रत्यय त्यांच्या वागण्यातून येत असे, कारण त्यांचा विरोधकांशी देखील कधीच द्वेष नव्हता. भास्कर सिनारे यांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण चिखली गावावर शोककळा पसरली. त्यांच्या सन्मानार्थ ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे गावचे सर्व व्यवहार बंद ठेवून आपल्या लाडक्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली. आमचा आधार गेला, अशी भावना प्रत्येक ग्रामस्थाच्या डोळ्यातील अश्रूंमधून व्यक्त होत होती. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली आणि पाच बहिणी असा आप्तपरिवार आहे.

**शांत स्वभाव अन् संयमी वृत्ती,**
**मदतीचा हात सदैव दिला...**
**चिखली ग्रामच्या मातीमधील,**
**हा 'हिरा' आज हरपला.**

स्व. भास्कर मारुती सिनारे यांचा दशक्रियाविधी शनिवार, दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी चिखली येथील आढळा नदीच्या पवित्र तीरावर पार पडणार आहे. यावेळी विविध क्षेत्रातील राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण करणार आहेत.



**॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥**

**हनुमंत भीमराज सदाफळ**
**(सहशिक्षक कलेक्टर्स हायस्कूल चिखली)**








राजहंस दूध संघाचे संचालक,
चिखली गावचे माजी सरपंच

**कै. भास्करराव मारूती सिनारे पा.**

यांना

**॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥**



शोकाकूल

**श्री छत्रपती शिवाजी महाराज सहकारी दुध संस्था, चिखली**

**आनंद किसन मेमाणे - व्हा. चेअरमन**

संचालक मंडळ - दगडू शिवा हासे, राजेंद्र शंकरराव कवडे, नवनाथ नारायण हासे, भानुदास विष्णू सहाणे, भासकर रामनाथ हासे, पोपट रामनाथ हासे, संजय अमृता हासे, भाऊसाहेब नामदेव मेमाणे, भारत संपत केरे, साहेबराव रामनाथ सिनारे, सौ. वर्षा मारूती हासे, सौ. रतन सोमनाथ हासे, सौ. कल्पना संतोष जमधडे, हनुमान देविदास बैरागी

**सर्व सभासद, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, चिखली, ता. संगमनेर**



राजहंस दूध संघाचे संचालक,
चिखली गावचे माजी सरपंच

**कै. भास्करराव मारुती सिनारे पा.**

यांना
भावपूर्ण श्रध्दांजली !

- शोकाकूल -

**चिखली विविध कार्यकारी सेवा सोसायटी लिमिटेड, चिखली**

शंकर हरिभाऊ सहाणे – चेअरमन
अशोक दशरथ हासे – व्हा. चेअरमन

- संचालक मंडळ-

आत्माराम माधव हासे, भारत केरू सहाणे, दिलीप निवृत्ती हासे, रामनाथ भाऊ देशमुख, साहेबराव सहादु हासे, देवराम आवडाजी मेमाणे, एकनाथ दशरथ जमधडे, नंदु बबन हासे, सौ. लता रघुनाथ कवडे, सौ. रंजना राधाकिनस सिनारे मधुकर यादव हासे,

सेवक वर्ग – विनायक शविराम भोकनळ, कु. किरण भिमाजी भागवत, लहानु माधव हासे

**सर्व सभासद, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, चिखली, ता. संगमनेर**



राजहंस दूध संघाचे संचालक,
चिखली गावचे माजी सरपंच

**कै. भास्करराव मारुती सिनारे पा.**

यांना
भावपूर्ण श्रध्दांजली !

- शोकाकूल -

**मोठेबाबा तरूण मित्रमंडळ, चिखली**

**भास्करराव सिनार तरूण मित्रमंडळ, चिखली**

सर्व सदस्य व ग्रामस्थ

# साश्रूनयनांनी भावपूर्ण श्रध्दांजली!

## भास्करराव सिनारे जाण्याने चिखली गाव पोरके झाले



बिनधास्त होती वाणी करारी होता बाणा,
जिद्दीने टक्कर दिली वाकवला नाही कणा.
सत्तेसाठी नाही ते सत्यासाठी लढले,
गोरगरीबांसाठी ते अनेकांना भिडले
सिनारे परिवाराचा होता मोठा अभिमान,
चिखली गावच्या जनतेची होती शान.
कधी पाहीली नाही जात तरुणाईच्या खांद्यावर हात,
मा.भास्करशेठ नांव राहील नेहमीच जणमाणसांच्या हृदयात
गुरुवारची ही भयान संध्याकाळ काळाने केला मोठा घात,
शेवटचा श्वास घेतला गेले सोडून सर्वांची साथ.

चिखली गावच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अत्यंत अभ्यासू,धाडसी व बेधडक व्यक्तिमत्व, अडीअडचणीच्या काळामध्ये प्रत्येकाच्या मदतीला धावून जाणारा व नेहमी सत्तेच्या बाजूने लढणारा एक लढवय्या नेता आज हरपला... नियतीचा आणि दैवाचा खेळ कुणालाच कळला नाही हे सत्य आहे. मा.भास्करशेठ सिनारे यांच्यासारखे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आपल्यातून जाणं ही मोठी शोकांतिका आहे. देव त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या कुटुंबाला या कठीण प्रसंगातून सावरण्याची शक्ती देवो. अत्यंत दुखद अंतकरणाने तमाम चिखलीकरांच्या वतीने या उमद्या व्यक्तिमत्वास भावपूर्ण श्रद्धांजली.

**शोकाकुल**
**डॉ. सागर फापाळे आणि परिवार चिखली**

## चिखली गावचे आधारस्तंभ भास्करराव सिनारे पाटील



संगमनेर तालुक्यातील प्रवरामाईच्या काठावर वसलेल्या चिखली गावच्या प्रत्येक जनतेच्या हृदयात घर करणारे आणि सामाजिक विकास, गावचा काया-पालट करण्यासाठी आपले संपूर्ण जीवन व्यतीत करणारे व्यक्तिमत्व म्हणजे भास्करराव मारुती सिनारे. त्यांच्या आकस्मिक निधनाची बातमी समजताच चिखली गावासह संपूर्ण संगमनेर तालुका शोकसागरात बुडाला. गावचा विकासपुरुष, संवेदनशील नेता आणि समाजासाठी अखंड झटणारा आधारवड हरपल्याची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली.

भास्करराव सिनारे यांचा जन्म १/६/१९६२ रोजी मारुती रावजी पाटील सिनारे व मथाबाई मारुती सिनारे यांच्या पोटी जन्म झाला. त्यांचे शिक्षण १२ वी सायन्स पर्यंत झाले. त्यांना पाच बहिणी. तसेच त्यांना एक मुलगा व दोन मुली आहेत. त्यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. त्यांना राजकारणाचे बाळकडू आपल्या वडीलांकडूनच मिळाले. यांच्या वडीलांचे देखील चिखली गावच्या विकासात मोठे योगदान होते. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांना मदत व आधार देण्याची परंपरा जपली. गावातील कोणताही व्यक्ती अडचणीत असो, आजारी असो, किंवा शासकीय कामासाठी त्रस्त असो भास्करराव हे प्रत्येकासाठी आधारवड होते.

चिखली गावात त्यांना भास्करराव तसेच भाऊ या नावाने ओळखले जायचे. त्यांच्या नावामध्येच ज्याप्रमाणे सुर्याचा उदय होतो, तसाच चिखली गावाच्या विकासाचा उदय दडलेला होता. त्यांच्या समाजसेवेचा खरा उदय ९० च्या दशकात झाला. ते स्व. सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी भोरात ऊर्फ दादा यांच्या समाज कार्याच्या विचाराने पछाडलेले होते. त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात सन १९९२-९३ या वर्षी छत्रपती शिवाजी महाराज दूध संस्थेच्या पंचवार्षिक निवडणूकीच्या माध्यमातून झाली. या दुध सस्थेच्या चेअरमन पदाची धुरा सांभाळत ३० ते ३५ वर्ष संस्थेचा कारभार उत्तमरीत्या पाहिला. छत्रपती दुध संस्थेच्या माध्यमातून विकासाची गंगा चिखली गावच्या घराघरात पोहचवली व अनेकांचे संसार फुलविले. शेवटच्या क्षणापर्यंत ते संस्थेचे चेअरमन होते. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी संस्थेचे व दूध उत्पादकांचे हीत जोपासले.

दूध संस्थेच्या माध्यमातून त्यांनी आपली कामाची व विकासाची नाळ चिखली गावचा प्रत्येक घरात जोडली. त्यांनी समाजकारणाचा ध्यास घेतला व पुढे गावच्या प्रत्येक कामात सहभाग घेतला. त्यांनी आपल्या समाजकार्यातून गावच्या विकासाची नस ओळखली होती. प्रत्येक राजकारणाचे धडे त्यांनी चिखली गावचे माजी सरपंच बाळासाहेब वसंतराव देशमुख, माजी कामगार पोलीस पाटील गणपतराव केरूजी पाटील हासे तसेच पंचायत समितीचे माजी उपसभापती नंदकुमार बबनराव हासे यांच्या सहवासात गिरवले. वेळोवेळी त्यांचा मौलिक सल्ला घेतला. आपल्या गावचा विकास रथ अखंडपणे चालू ठेवला. भास्कररावांच्या समाजकार्याची व गावच्या विकासाची सुरुवात खऱ्या अर्थाने सन २००० ते २००५ या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूकीच्या माध्यमातून झाली. भास्कररावांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या पॅनलला घवघवीत यश मिळाले. प्रथमच ते चिखली गावचे सरपंच म्हणून विराजमान झाले. त्यांना खरी साथ मिळाली ती म्हणजे उपसरपंच म्हणून ज्यांनी धुरा संभाळली ते शंकरराव हरीभाऊ सहाणे यांची. या राम-लक्ष्मणाच्या जोडीने त्यावेळीच चिखली गावच्या विकासाची जणू - शपथच घेतली होती. ती त्यांनी सार्थ करून दाखविली.

प्रथम सरपंच झाल्यानंतर आपल्या संगमनेर तालुक्याचे भाग्यविधाते माजी महसूल मंत्री मा. बाळासाहेब थोरात साहेब यांच्याशी, भास्करराव तेव्हा पासून अत्यंत विश्वासू व खंदे समर्थक बनले. भास्करराव हे थोरात साहेबांचे अत्यंत लाडके कार्यकर्ते होते. ते अत्यंत हुशार, स्पष्टवक्ते, संवेदनशील होते. भास्कररावांनी थोरात साहेबांच्या माध्यमातून अनेक विकासाच्या योजना चिखली गावात आणल्या व गावचा चेहरा मोहरा बदलविला. त्यावेळी लोकांना पिण्यासाठी पाण्याची समस्या होती. ती ओळखळून आपल्या घरी, शेतीसाठी आणलेली प्रवरा नदीची पाईपलाईन स्वखर्चाने जुन्या ग्रामपंचायतपर्यंत आणून गावातील नागरीकांना खुली करून दिली. व गावातील नागरीकांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लावला. एवढं करूनही ते थांबले नाही, पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी त्यांनी स्व. त्रिबंक सदाशिव सिनारे यांना विश्वासात होऊन त्यांच्याकडून ग्रामपंचायत पाणी पुरवठ्यासाठी नदीकाठी जागा बक्षिसपत्र करून स्वखुशीने मिळवून दिली. चिखली गावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवत गावातील महीलांच्या डोक्यावरील हंडा उतरविला. भास्कररावांनी नागरीकांच्या उत्तम आरोग्यासाठी शासकीय आरोग्य केंद्राची उभारणी केली. त्या माध्यमातून आरोग्याची काळजी घेण्याचे महान कार्य केले. तसेच गावातील विविध रस्त्यांची निर्मिती, मजबूतीकरण केले. याचबरोबर त्यांनी शिक्षण क्षेत्रात देखील भरीव कार्य केले. त्यामध्ये जि. प. प्राथमिक शाळेसाठी भव्य कंपाऊंड वॉलची उभारणी करून शाळा सुरक्षित केली. भास्कररावांनी ग्रामपंचायतीसाठी भव्य व सर्व सुविधा युक्त अशी सुसज्ज इमारत बांधली. विकासाचा कारभार तेथूनच चालविला. त्यांनी वीज, रस्ते, शिक्षण, आरोग्य व इतर विकास कामे करून गावच्या विकासात भर मोठी भर घातली. भास्करराव सन २००० पासून आजपर्यंत अविरत चिखली गावचे सरपंच व सदस्य राहिले.

दूध संस्थेच्या माध्यमातून थोरात साहेबांनी भास्कररावांच्या कार्याची दखल घेत त्यांना २०१५ सालापासून आतापर्यंत राजहंस दूध संघाच्या संचालकपदी काम करण्याची संधी दिली. भास्कररावांनी देखील संधीचे सोने करून साहेबांचा विश्वास सार्थ ठरविला. साहेबांसाठी प्रत्येक वेळी खांद्याला खांदा लावून लढले, शेवटच्या श्वासापर्यंत एकनिष्ठ राहिले व आपले समाजकार्य करीत राहीले. अशा या महाम समाज सेवकाला त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली...!!!!.

**सोमनाथ नारायण सिनारे,**
**चिखली, ता. संगमनेर**

### चिखली गावचा विकास पुरुष

चिखलीच्या मातीचा खरा पुत्र महान,
भास्करराव सिनारे होते जनतेचा अभिमान.
गोरगरीबांच्या डोळ्यातले अश्रू पुसणारा हात,
समाजासाठी वाहिले त्यांनी आयुष्यभरात

स्वार्थाचा कधीही घेतला नाही आधार
गावच्या विकासासाठी दिला अखंड विचार.
रस्ते, पाणी, वीज, शिक्षण यासाठी केली धडपड,
जनतेच्या सुखासाठी केले अथक परिश्रम.

शेवटच्या श्वासापर्यंत ठेवली सेवा जिवाशी,
गाव उभे राहिले त्यांच्या कर्तृत्वाच्या प्रकाशी
त्याग, कष्ट, प्रामाणिकपणाची त्यांनी दिली शिकवण,
चिखलीच्या इतिहासात त्यांची नोंद
सुवर्ण अक्षरात राहील कायम.

आजही गाव सांगते अभिमानाने कथा,
भास्कररावांचे कार्य आहे प्रेरणेची व्यथा.
अशा महान समाज सेवकाला शतशः वंदन,
चिखली विकास पुरुषाला आमचा मानाचा मुजरा !

**– सोमनाथ शिवाजी सिनारे, चिखली**



कै. भास्कर मारूती सिनारे यांची सलग तिसऱ्यांदा राजहंस दुध संघ संचालकपदी निवड झाली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतांना माजी मंत्री आ. बाळासाहेब थोरात












राजहंस दूध संघाचे संचालक,
चिखली गावचे माजी सरपंच
कै. भास्करराव मारुती सिनारे पा.
यांना
॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥
शोकाकुल
ग्रामपंचायत कार्यालय, धांदरफळ खुर्द
विविध कार्यकारी सेवा सोसायटी, धांदरफळ खुर्द
प्रवरा सह. दुध उत्पादक संस्था, धांदरफळ
शिवछत्रपती स्वयंरोजगार सह. संस्था, धांदरफळ
प्रवरा ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था, धांदरफळ
सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हा. चेअरमन
सर्व संचालक धांदरफळ खुर्द


राजहंस दूध संघाचे संचालक, चिखली गावचे माजी सरपंच
कै. भास्करराव मारुती सिनारे पा.
यांना
॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥
शोकाकूल
ग्रामपंचायत कार्यालय चिखली, ता. संगमनेर
सरपंच - श्री. रविंद्र ज्ञानदेव बर्डे, उपसरपंच - सौ. रत्नमाला आणणासाहेब हासे,
सदस्य मंडळ- सौ. विमल काकासाहेब हासे, प्रभाकर भानुदास मेमाणे,
सौ. रंजना रंगनाथ हासे,सौ. मंदाकिनी मधुकर केरे,
मच्छिंद्र बबन हासे, सौ. शितल सदाशिव हासे
श्री. अण्णासाहेब तुकाराम सिनारे (लिपीक), गोरख आनंदा हासे (पा. पु. कर्मचारी)
सिद्धार्थ कैलास सोनवणे (संगणक परिचालक), अरूण सारंगधर बर्डे (शिपाई)


राजहंस दूध संघाचे संचालक,
चिखली गावचे माजी सरपंच
कै. भास्करराव मारूती सिनारे पा.
यांना भावपूर्ण श्रद्धांजली !
शोकाकूल
संत ज्ञानेश्वर ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या. चिखली, ता. संगमनेर
भानुदास शंकरराव उपाध्ये - चेअरमन | शांताराम गेणू सिनारे - व्हा. चेअरमन
संचाल मंडळ- भानुदास त्रिंबक देशमुख, रणिजत प्रकाश हासे, ज्ञानदेव हरी मेमाणे
प्रदिप भाऊसाहेब वामन, तुषार तुकाराम सहाणे, आनंद बाबुराव जमधडे, अंकुश रामचंद्र चव्हाण
सौ. अलका राजेंद्र हासे, सौ. संगिता अशोक हासे, अण्णासाहेब शिवाजी हासे
सागर लहानू हासे, प्रविण चांगदेव हासे, बाळासाहेब रामभाऊ वलवे (व्य. संचालक)
सर्व सभासद, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, चिखली, ता. संगमनेर


राजहंस दूध संघाचे संचालक, चिखली गावचे माजी सरपंच
कै. भास्करराव मारूती सिनारे पा.
यांना भावपूर्ण श्रद्धांजली !
शोकाकूल
जिजाऊ ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या. चिखली, ता. संगमनेर
बाळासाहेब दगडू कवडे - चेअरमन भाऊसाहेब सुखदेव हासे - व्हा. चेअरमन
संचालक मंडळ- साहेबराव बाळकृष्ण सहाणे, रामनाथ भाऊपाटील सिनारे,
बाळासाहेब संपत हासे, शेखर सुखदेव मेमाणे, भाऊसाहेब शरद देशमुख, नामदेव भागा बर्डे,
रोहिदास भास्कर बैरागी, सौ. आशा भाऊसाहेब हासे, सुचित गणेश हासे, रंगनाथ बजाबा उगले,
विजय नरसिंगराव देशमुख, जनार्दन देवराम सहाणे, सोमनाथ तुकाराम हासे
सर्व सभासद, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, चिखली, ता. संगमनेर


राजहंस दूध संघाचे संचालक,
चिखली गावचे माजी सरपंच
कै. भास्करराव मारुती सिनारे पा.
यांना
॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥
राजमाता जिजाऊ सह. दुध संस्था मर्या. चिखली, ता. संगमनेर
श्री. अरूण सहाणे - चेअरमन श्री. अनिल मेमाणे - व्हा. चेअरमन
संचालक मंडळ- श्री. राजेंद्र हासे, श्री. रामदास सहाणे, श्री. राजेंद्र मेमाणे, संभाजी सिनारे,
श्री. बाळासाहेब उपाध्ये, श्री. बाळासाहेब कवडे, श्री. गंगा हासे, श्री. भाऊसाहेब हासे,
श्री. जनार्दन सहाणे, श्री. दगडू सिनारे, श्री. संतोष सुर्यवंशी, श्री. माधव सिनारे, सौ. लता हासे,
सौ. सुजाता देशमुख, सौ. छबुबाई बर्डे, श्री. जयराम सिनारे (सचिव), श्री. अशोक हासे (संकलक)
सर्व सभासद, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, चिखली, ता. संगमनेर


राजहंस दूध संघाचे संचालक, चिखली गावचे माजी सरपंच
कै. भास्करराव मारुती सिनारे पा.
यांना
॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥
शोकाकूल
शिवशांती वीट सप्लायर्स
चिखली, ता. संगमनेर
हासे पाटील इस्टेट
संगमनेर, जि. अहिल्यानगर
शुभम हासे पाटील कन्स्ट्रक्शन
कंपनी (SHP) संगमनेर


राजहंस दूध संघाचे संचालक,
चिखली गावचे माजी सरपंच
कै. भास्करराव मारुती सिनारे पा.
यांना
॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥
शोकाकूल
लक्ष्मी माता तरुण मित्र मंडळ, चिखली
अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्य


राजहंस दूध संघाचे संचालक,
चिखली गावचे माजी सरपंच
कै. भास्करराव मारुती सिनारे पा.
यांना
॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥
शोकाकूल
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिखली
शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष
सर्व सदस्य मुख्याध्यापक व शिक्षक वृंद


राजहंस दूध संघाचे संचालक, चिखली गावचे माजी सरपंच
कै. भास्करराव मारूती सिनारे पा.
यांना भावपूर्ण श्रद्धांजली !
शोकाकूल
अरविंद सोमनाथ हासे
(सिव्हील कॉन्ट्रॅक्टर)

# संपादकीय...

महात्मा ज्योतीराव फुले जयंतीनिमित्त

## समतेची ज्योत प्रज्वलित करणारे समाजपुरुष



भारतीय समाजजीवनात सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार आणि मानवी हक्क यांसाठी आयुष्य अर्पण करणारे महान विचारवंत म्हणजे महात्मा जोतीराव फुले. ११ एप्रिल १८२७ रोजी त्यांचा जन्म झाला आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी समाजपरिवर्तनाचा दीप प्रज्वलित केला. आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा विचार केला, तर आधुनिक भारताच्या घडणीत त्यांचे योगदान किती भक्कम आहे, याची जाणीव प्रकर्षाने होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. साध्या कुटुंबात जन्मलेल्या जोतीरावांना लहानपणापासूनच शिक्षणाची ओढ होती. समाजातील विषमता, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचा त्यांनी जवळून अनुभव घेतला. शिक्षण हेच समाजबदलाचे प्रभावी साधन आहे, ही त्यांची ठाम धारणा होती. त्यामुळे त्यांनी स्वतः शिक्षण घेतलेच, पण समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचा ध्यास घेतला. या कार्यात त्यांना त्यांच्या सहचारिणी सावित्रीबाई फुले यांची मोलाची साथ लाभली. १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली, हा भारतीय शिक्षण इतिहासातील क्रांतिकारक टप्पा ठरला. त्या काळात मुलींचे शिक्षण पाप समजले जात असताना त्यांनी हा धाडसी निर्णय घेतला. समाजातील तीव्र विरोध, अपमान आणि धमक्या यांचा सामना करत त्यांनी शिक्षणाचा दिवा तेवत ठेवला. आज महिलांनी विविध क्षेत्रांत केलेली प्रगती ही त्यांच्या त्या धाडसी पावलांचीच फलश्रुती आहे. समाजातील जातीय भेदभाव, अस्पृश्यता आणि अन्याय यांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी १८७३ मध्ये त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शूद्र-अतिशूद्र समाजाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अन्यायकारक प्रथांचा त्यांनी कठोर विरोध केला. सर्व मानव समान आहेत हा त्यांचा विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. महात्मा फुले हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक प्रभावी लेखकही होते. त्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था मांडली, तर 'गुलामगिरी' या ग्रंथातून त्यांनी सामाजिक गुलामीवर प्रहार केला. त्यांच्या लेखनात केवळ विचार नव्हते, तर ते कृतीची प्रेरणा देणारे होते. त्यांनी मांडलेले विचार आजही सामाजिक न्यायाच्या लढ्याला दिशा देतात. महात्मा फुलेंच्या कार्याची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्यांनी समाजपरिवर्तनाची सुरुवात स्वतःच्या घरापासून केली. पत्नीला शिक्षण देणे, मुलींसाठी शाळा सुरू करणे, अस्पृश्यांसाठी शिक्षणाची दारे उघडणे, या सर्व कृतींमधून त्यांनी आदर्श निर्माण केला. त्यांच्या विचारांमध्ये केवळ तत्त्वज्ञान नव्हते, तर प्रत्यक्ष कृतीचा ठसा होता. आजच्या काळात, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच समाजात अजूनही विषमता, अंधश्रद्धा आणि शिक्षणातील असमानता दिसून येते. अशा वेळी महात्मा फुलेंचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. शिक्षणाचा प्रसार, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय यांसाठी त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच सुसंगत आहे. महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले की, समाज बदलायचा असेल, तर त्यासाठी जिद्द, धैर्य आणि दूरदृष्टी आवश्यक असते. त्यांनी प्रज्वलित केलेला परिवर्तनाचा दीप आजही समाजाला मार्गदर्शन करीत आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ अभिवादन नव्हे, तर त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच खरी कृतज्ञता ठरेल.

# खांडगाव जिल्हा परिषद शाळेत 'के. जी.' वर्गांचा प्रारंभ, माफक दरात मिळणार दर्जेदार शिक्षण



संगमनेर (प्रतिनिधी)- संगमनेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने शैक्षणिक क्षेत्रात एक नवी झेप घेतली असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ज्युनिअर केजी आणि सिनियर केजीचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या उपक्रमाचे उद्घाटन गावातील मान्यवर, शिक्षणप्रेमी आणि पालकांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडले.

सध्याच्या स्पर्धात्मक युगात मुलांच्या शिक्षणाचा पाया भक्कम असणे आवश्यक आहे. हीच गरज ओळखून शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षक वृंद यांनी पुढाकार घेऊन हे वर्ग सुरू केले आहेत. या वर्गांच्या अध्यापनासाठी शिक्षिका म्हणून प्रिया गुंजाळ यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या माध्यमातून हसत-खेळत विद्यार्थ्यांना कृतियुक्त शिक्षणाचे धडे दिले जाणार आहेत.

आजच्या काळात शहरांमधील इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये केजी वर्गांसाठी ३० ते ४० हजार रुपयांच्या आसपास भरमसाठ शुल्क आकारले जाते. मात्र, खांडगाव जिल्हा परिषद शाळेने हेच उच्च दर्जाचे शिक्षण अगदी माफक दरामध्ये उपलब्ध करून दिले आहे. यामुळे सामान्य पालकांची आर्थिक ओढताण थांबणार असून, मुलांना त्यांच्या स्वतःच्या गावातच दर्जेदार शिक्षण मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेच्या वतीने पालकांना भावनिक आवाहन करण्यात आले आहे. आपल्या मुलांचे भवितव्य घडवण्यासाठी महागड्या शाळांकडे धाव घेण्यापेक्षा, आपल्या हक्काच्या जिल्हा परिषद शाळेवर विश्वास ठेवा. जि.प. शाळेत केवळ शिक्षणच नाही, तर मुलांच्या संस्कारांचीही जपणूक केली जाते. सुरक्षित वातावरण, अनुभवी शिक्षक आणि माफक फी या त्रिसूत्रीचा लाभ घेऊन पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेश त्वरित निश्चित करावेत, असे आवाहन शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे पालकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, पहिल्याच दिवशी पालकांचा चांगला प्रतिसाद लाभला. खांडगावच्या या शैक्षणिक प्रयोगाचे परिसरात

# पत्रकार दत्तात्रय घोलप "अहिल्यानगर भूषण" पुरस्काराने सन्मानित



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर तालुक्यातील काकडवाडी गावचे भूषण, युवा पत्रकार दत्तात्रय घोलप यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये समाजसेवेच्या माध्यमातून तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न शासन दरबारी मांडून समाजाला न्याय देण्याचा महत्त्वपूर्ण कार्य केल्याबद्दल, आज गुरुवार दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजता, संगमनेर तालुक्यातील कसारे येथे साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहाण सोहळ्याप्रसंगी, सरला बेटाचे महंत रामगिरीजी महाराजांच्या हस्ते, बहुजन ग्रामीण विकास सेवा असोसिएशन संघाच्या वतीने दिला जाणारा अहिल्यानगर भूषण पुरस्काराने पत्रकार दत्तात्रय रामदास घोलप यांना सहपत्नीक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

याप्रसंगी विचार मंचावर हिंदू धर्मयुद्ध ह.भ.प. नवनाथ महाराज म्हस्के, नाशिक महानगरपालिकेचे नगरसेवक भागवतभाऊ आरोटे, कार्यक्रमाचे आयोजक संतोषराव शेळके, बहुजन ग्रामविकास सेवा असोसिएशन संघाचे सचिव पत्रकार रामनाथ बोऱ्हाडे, आदींसह मान्यवरांची उपस्थित होती. पत्रकार दत्तात्रय घोलप यांना अहिल्यानगर भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे. पत्रकार दत्तात्रय घोलप यांच्या वाटचालीस मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

# भाजप स्टार प्रचारक यादीत जिल्ह्यातील चौघांचा समावेश



राहुरी (युवावार्ता प्रतिनिधी )- राज्यातील राहुरी, बारामती निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने जाहीर केलेल्या स्टार प्रचारकांमध्ये नगर जिल्ह्यातील चार मान्यवरांचा समावेश आहे .

येत्या २३ एप्रिल रोजी राहुरी आणि बारामती विधानसभेची पोटनिवडणूक होत आहे . यासाठी भारतीय जनता पक्षाने राज्यातील ४० नेत्यांची स्टार प्रचारक म्हणून जाहीर केले आहेत.

यात प्रामुख्याने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण , केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह ४० जणांची यादी जाहीर केली असून नगर जिल्ह्यातील नगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे , माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार मोनिकाताई राजळे यांचा समावेश आहे .

येत्या २३ एप्रिल रोजी राहुरी विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक होत असून कै. शिवाजीराव कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले हे भाजपाच्या वतीने निवडणूक रिंगणात उभे राहिले आहे .

## शिवसेनेच्या इशाऱ्यानंतर...(पान नं. १ वरुन)

अशी ठाम मागणी करण्यात आली होती. मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या निर्देशानुसार प्रशासन अधिकारी प्रल्हाद देवरे यांच्या नेतृत्वाखाली बांधकाम विभागाच्या पथकाने घटनास्थळी धडक देत अतिक्रमण हटवले. या पथकात महेश गोरडे, अल्ताफ शेख, ओंकार सहाणे, वैष्णवी गडाख, ज्योती आव्हाड, जयराम मंडलिक, राजू मस्के यांचा समावेश होता. या कारवाईमुळे संगमनेरमध्ये बेकायदेशीर बांधकामांवर पालिकेची कडक भूमिका स्पष्ट झाली असून, पुढील काळात अशा अतिक्रमणांवर आणखी कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
हेल्पर - २
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०२ जागा
टॅली कोर्स
ड्रायव्हर - ३ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड संगमनेर
9370071777
9822791484

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7030125701

**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे – ०२ जागा
(गाडी व लायसन्स पाहिजे)
दुकानकामासाठी डिलीव्हरी बॉय पाहिजे – ०२ जागा
9766921306

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०१ जागा
(बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी ॲग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला,वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी



CorelDRAW
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005



धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची






MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था
सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

# भंडारदरा धरणातून आदिवासींना पाणी देण्याच्या सर्वेला सुरुवात

## किसान सभेच्या लढ्याला मोठे यश !



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - आदिवासी भागातील भंडारदरा धरणाच्या मागील बाजूकडील सर्व गावांना व धरण भिंतीच्या पूर्वेकडील परिसरातील सर्व गावांना भंडारदरा धरणाचे पाणी शासकीय योजनेतून देण्याबाबत सर्वेक्षणास आज मंजुरी देत सुरुवात करण्यात आली. लाँग मार्चमध्ये मान्य करण्यात आलेल्या मागण्यांच्या आढाव्यासाठी अकोले तहसील कार्यालयामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष किसान सभा व सी टू च्या विविध संघटनांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. बाळासाहेब कोळेकर हे व्हिसीद्वारे या बैठकीत उपस्थित होते. प्रांताधिकारी श्री. मुंडे साहेब व तहसीलदार श्री. मोरे साहेब यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत विविध खात्याचे सर्व अधिकारी बैठकीसाठी उपस्थित होते.

लाँग मार्चमध्ये भंडारदारा परिसरातील सर्व आदिवासींना धरणाचे पाणी शासकीय योजनेने देण्याबाबत मागणी मान्य करण्यात आली होती. मंत्रालयस्तरावर झालेल्या बैठकीत यासंदर्भात आदेशही देण्यात आले होते. आज झालेल्या पाठपुराव्याच्या बैठकीमध्ये या सर्वेला प्रत्यक्ष सुरुवात करण्याचे आदेश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी निर्गमित केल्याची माहिती अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. बाळासाहेब कोळेकर यांनी दिली. जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना या संदर्भातले आदेश प्राप्त झाले असून प्राथमिक सर्वेक्षण पुढील आठवड्याभरात पूर्ण करण्यात येईल असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. भंडारदरा धरणाला १०० वर्ष होत असताना तेथील आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी व पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही मोठी उपलब्धी ठरणार आहे.

भंडारदरा धरणात जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना मोबदला म्हणून दिलेल्या जमिनी वर्ग दोन ऐवजी वर्ग एक प्रकाराच्या करून त्यांना त्यांचे मालक करण्याच्या बद्दल सुद्धा सकारात्मक चर्चा या बैठकीत झाली. अकोले तालुक्यातील घरांच्या तळ जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करण्यासाठीची प्रकरणे किसान सभेच्या वतीने दोन वर्षांपूर्वी तहसील कार्यालय यांच्याकडे जमा करण्यात आली असून या प्रकरणांच्या नुसार सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. आता आलेल्या नव्या शासनादेशाप्रमाणे २०११ च्या पूर्वीची अशा प्रकारची घर तळजमिनी संबंधितांच्या नावे करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश आजच्या बैठकीत देण्यात आले.

कसत असलेल्या वन जमिनीच्या प्रत्यक्ष पडताळणीची प्रक्रिया लाँग मार्चच्या पार्श्वभूमीवर मान्य करण्यात आली असून यासंदर्भात किसान सभेने सादर केलेल्या ९४८ प्रकरणांची पडताळणी तातडीने सुरू करण्यात येत असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

आशा कर्मचारी, शालेय पोषण आहार कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, बांधकाम कामगार यांचे प्रश्नही यावेळी सविस्तर चर्चा करून सोडवण्याच्या दृष्टिकोनातून निर्णय करण्यात आले. आदिवासी भागात जल जीवन अंतर्गत करण्यात आलेल्या रतनवाडी व खडकी बुद्रुक येथील योजनांबाबत गंभीर तक्रारी यावेळी मांडण्यात आल्या. तसेच आंबेवंगण येथील शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना पिण्याचे पाणी देण्याबाबत आग्रहही बैठकीत लावून धरण्यात आला.

डॉ. अजित नवले, सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, गणेश ताजने, तुळशीराम कातोरे, हेमलता शेळके, संगीता साळवे आदी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# अवैध गर्भपात करणाऱ्या डॉक्टर, रुग्णालयांवर मकोकाची कारवाई

मुंबई (वृत्तसंस्था)



राज्यात स्त्रीभ्रूणहत्यांचे प्रमाण रोखण्यासाठी आणि अवैध गर्भपाताच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी राज्य सरकार अत्यंत कठोर पावले उचलत आहे. यापुढे अवैध गर्भपातासारखे गंभीर गुन्हे वारंवार करणाऱ्या डॉक्टरांविरुद्ध आणि रुग्णालयांविरुद्ध ('संघटित गुन्हेगारीचे केंद्र') म्हणून मकोका अंतर्गत कारवाई करणार आहे. या संदर्भात कायद्यात सुधारणा करणार असल्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

मराठवाडा तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसांमध्ये अवैध गर्भपाताच्या घटना घडल्या. या प्रकरणांमध्ये आरोपी कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन सुटतात. ते पुन्हा अशाच प्रकारचा गुन्हा करतात. ही बाब गंभीर असल्याचे आबिटकर यांनी सांगितले. ही गंभीर बाब रोखण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणी अधिवेशनामध्ये सर्वपक्षीय आमदारांशी चर्चा झाली. त्यानंतर बैठकही घेण्यात आली. गुन्ह्याचे गांभीर्य आणि शिक्षेची तरतूद वाढवण्यासाठी विधी व न्याय विभागाची परवानगी आवश्यक होती. सध्या अवैध गर्भपात आणि स्त्रीभ्रूणहत्या प्रकरणांत प्रामुख्याने पीसीपीएनडीटी कायदा (१९९४): गर्भधारणापूर्व आणि प्रसूतिपूर्व निदान तंत्र कायदा. याअंतर्गत लिंगनिदान करणे हा गुन्हा आहे. एमटीपी कायदा (१९७१): वैद्यकीय गर्भपात कायदा. यानुसार विनापरवाना किंवा चुकीच्या पद्धतीने गर्भपात केल्यास कारवाई होते. भारतीय दंड संहितेच्या कलम ३१२ ते ३१५ नुसार (गर्भवती स्त्रीचा गर्भपात करणे, जीवितास धोका निर्माण करणे) कारवाई केली जाते.

# एलपीजी गैरवापर रोखण्यासाठी कठोर पावले ई-केवायसी आणि DAC प्रणाली लागू

मुंबई (वृत्तसंस्था)

पश्चिम आशियातील सध्याच्या संकटामुळे देशभरात एलपीजी सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाला. एलपीजीच्या पुरवठ्याबाबत दबाव वाढत असून त्या पार्श्वभूमीवर आता सरकारने ग्राहकांना घाबरून खरेदी न करण्याचा आणि अनावश्यक एलपीजी बुकिंग न करण्याचा इशारा दिला आहे. एलपीजी सिलेंडरसाठी अनेक नागरिक थेट वितरकांकडे जाऊन रांगा लावताना दिसत आहेत. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने नागरिकांना डिजिटल बुकिंग माध्यमांचा वापर करण्याचं आवाहन केलं आहे. जेणेकरून वितरण सुव्यवस्थित होईल आणि पुरवठ्यातील व्यत्यय टाळता येईल. यासाठी इंडेन, भारत गॅस आणि एचपी गॅससाठीच्या ऑनलाइन बुकिंगमधअये अलिकडच्या दिवसांत जवळपास ९५ टक्के वाढ झाली आहे. त्यातही अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आणि गैरवापर रोखण्यासाठी डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड अनिवार्य करण्यात आला आहे. शहरी भागांमध्ये रिफिल बुकिंगचा कालावधी २५ दिवसांपर्यंत असून ग्रामीण भागांमध्ये तो ४५ दिवसांपर्यंत आहे. त्याचबरोबर रिफायनरी उत्पादन वाढवण्यात आलं असून अत्यावश्यक क्षेत्रांसाठी पुरवठ्याला प्राधान्य दिलं जात आहे. ग्राहक मोबाइल ॲप्स, अधिकृत वेबसाइट्स, एसएमएस, आयव्हीआरएस, व्हॉट्सप आणि मिस्ड कॉल्स यांसारख्या अनेक डिजिटल माध्यमांद्वारे एलपीजी सिलिंडर बुकिंग करू शकतात. इंडियन ऑइल, बीपीसीएल, एचपीसीएल प्स, तसंच उमंग, पेटीएम आणि फोनपे यांसारखे प्लॅटफॉर्मसुद्धा सुलभ बुकिंग पर्याय देतात. यामुळे तुम्हाला प्रत्यक्ष वितरकांकडे जाण्याची गरज नाही.नवीन एलपीजी बुकिंग नियमानुसार (मार्च/एप्रिल २०२६ पासून) रिफिलसाठी अनिवार्य प्रतीक्षा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

# शेंडी विद्यालय महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र - राजेश कुमार ढड्डा




मी २००८ - २००९ साली जेंव्हा पर्यटक म्हणून भंडारदरा या ठिकाणी आलो होतो, तेव्हापासून या विद्यालयाच्या प्रेमात पडलो आहे. त्याचे कारणही तसेच आहे, ते म्हणजे या विद्यालयात शिकत असलेली ९९% मुले ही आदिवासी समाजाची आहेत. हे विद्यालय फिरता-फिरता नजरेत पडले. येथील प्रमुखांना भेटावे असे मनात विचार आल्यानंतर प्राचार्य रोगटे सरांना भेटल्यानंतर त्यांनी प्रेमाने केलेली विचारपूस व पाहुणचार तसेच विद्यार्थ्यांच्या समोर केलेले स्वागत व सन्मानाने तर भारावूनच गेलो. शिक्षकांशी चर्चा केल्यानंतर असे समजले की, या विद्यालयात २०-२५ किलोमीटर पासून विद्यार्थी आपापल्या परीने शिक्षणासाठी येत असतात. ग्रामीण भागात असून देखील विद्यार्थी चांगल्या मार्कांने पास होऊन आपापल्या क्षेत्रात चांगले करिअर करत आहेत. त्याचबरोबर वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपले अष्टपैलू व्यक्तिमत्व घडवून उत्तम संस्कार त्यांच्यावरती होत आहेत. त्यामुळे परिसराच्या दृष्टीने हे विद्यालय महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र आहे असे मला वाटते.

हे विद्यालय जर नसते तर कदाचित या विद्यालयात आज शिकणारी बरीच मुले शिक्षणापासून वंचित राहिले असते. कारण की, बऱ्याच विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. त्यामुळे राजुर, अकोले या ठिकाणी जाऊन शिक्षण घेणे शक्य नव्हते. म्हणून संस्थेने गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी हे विद्यालय सुरू करून फार चांगले काम केले आहे. हे विद्यालय खऱ्या अर्थाने या मुलांसाठी एक महत्त्वाचे ज्ञानमंदिर ठरले आहे.

गेली २५ वर्ष या शैक्षणिक संकुलाचे कॅप्टन म्हणून काम पाहणारे प्राचार्य दिलीपराव रोंगटे यांना जवळून पाहता आले. त्यांच्या डोक्यात केवळ शाळेचा सर्वांगिण विकास करणे हाच ध्यास होता. त्यांच्या या प्रयत्नास साथ देण्याचे ठरविले आणि जेवढे शक्य होईल तेवढी मदत करण्याचा मनापासून प्रयत्न केला. आज विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या सुविधा लोकसहभागातून निर्माण होत आहेत. हे पाहून मनस्वी आनंद वाटतो. या सुविधा निर्माण करण्यात खारीचा वाटा उचलता आला यात आम्ही आमचे भाग्य समजतो. विद्यालयाचे प्राचार्य नियत वयोमानानूसार ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. त्यांच्या अनुभवाचा भविष्यातील या विद्यार्थ्यांसाठी उपयोग होऊन या विद्यालयाचे वटवृक्षात रूपांतर होईल व त्यासाठी आमचेही सहकार्य घ्यावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. **श्री. राजेश कुमार ढड्डा व शोभा ढड्डा हे सामाजिक बांधिलकीची जाणीव व शैक्षणिक क्षेत्राची जाणीव असणारे दानशूर व्यक्तिमत्व आहे. सन २००८ पासून या विद्यालयासाठी ते जोडले गेले आहेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, विविध सुविधा त्यांना मिळाव्या ते भौतिक सुविधा वाढण्यासाठी त्यांनी विद्यालयाला कायम भरीव असा मदतीचा हात दिला आहे. भविष्य काळातही विद्यालयासाठी ते मदतीचा हात देतील असा विश्वास आहे.**

– प्राचार्य
दिलीपकुमार रोंगटे



श्री.राजेशकुमार ढड्डा सौ. शोभा ढड्डा

# शिक्षण क्षेत्रातील कल्पक नेतृत्व - प्राचार्य दिलीपराव रोंगटे



## सेवापूर्ती गौरव सोहळ्या निमित्ताने...

मा.दिलीप निवृत्ती रोंगटे हे प्रदिर्घ सेवेनंतर शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात पस्तीस वर्षे सेवा करून व शेंडी विद्यालयात अखंड पंचवीस वर्षे सेवा करून ३१/०५/२०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत होत आहेत. परिसराच्या वतीने त्यांच्या या दैदिप्यमान कार्याला प्रथम सलाम करतो.

मा. रोंगटे सर हे दिनांक १९ जून १९९१ साली आम्लेश्वर विद्यालय आंभोळ या ठिकाणी उपशिक्षक म्हणून हजर झाले. आणि सलग १० वर्षे उपशिक्षक या पदावर प्रभावीपणे काम करून विद्यार्थांच्या व पालकांच्या गळ्यातील ताईत बनले. त्या नंतर कै. अशोकराव भांगरे साहेब यांच्या प्रयत्नातून शेंडी विद्यालयात बदली झाली. त्या नंतर १/१/२००६ रोजी त्यांची प्राचार्य पदी बढती झाली व शेंडी विद्यालयाच्या रोपट्याचे हळूहळू वट वृक्षात रूपांतर व्हायला लागले. तसेच विद्यालयाचा सर्वांगीण विकास व्हायला सुरुवात झाली.

मा. रोंगटे सर हे साम्रद गावचे रहिवाशी असल्यामुळे त्यांना परिसराची सर्व कल्पना होती. आणि म्हणून सर्वांना एकत्र करून लोकसभागातून त्यांनी पाच वर्ग खोल्या बांधण्याचे नियोजन केले व एका वर्षात त्या बांधून पूर्ण केल्या. त्यांच्या अंगी कार्यकुशलता असल्यामुळे पुढे त्यांनी अनेक दानशूर व्यक्तिमत्व शोधून विद्यालयाचा भौतिक विकास कसा करता येईल याचा चंग बांधला. त्याचाच एक भाग म्हणून श्री.व सौ. ढड्डा यांची पर्यटनाच्या माध्यमातून ओळख झाली. त्यांनी विद्यालयास भेट दिल्यानंतर आपणास काय हवे असे विचारल्यानंतर प्रॅक्टीकलच्या हॉलची गरज आहे असे सांगीतल्यावर लगेच त्यांचे सहकार्य घेऊन प्रॅक्टिकल हॉल तयार केले. नंतर माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक, ग्रामस्थ यांचे योगदान घेऊन अद्यायावत अशा तीन प्रयोगशाळा बांधल्या.

विद्यार्थ्यांची कॉलेजात जाण्या-येण्याची गैरसोय होत होती. ती त्यांनी कॉलेज सकाळ सत्रात भरून दूर केली. हा सर्वांच्या दृष्टीने आनंदाचा क्षण होता. प्रयोगशाळा बांधल्यामुळे प्रॅक्टिकलची पण विद्यार्थ्यांची सोय झाली. त्या प्रयोगशाळेचे उद्घाटन माजी मंत्री स्व. मधुकररावजी पिचड साहेब यांच्या हस्ते २५ जून २०२४ रोजी करण्यात आले. त्यांचे कार्य पाहून पिचड साहेबांनी पाठीवरी शाबासकीची थाप दिली. त्यामुळे त्यांच्या कार्याचे सार्थक झाले असल्याचे सरांच्या चेहऱ्यावरती आजही जाणवत आहे.

शाळा हा त्यांचा श्वास होता. तर विद्यार्थ्यांचा सर्वागीण विकास हा त्यांचा ध्यास होता. शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना त्यांनी विद्यालयाला चांगले नेतृत्व दिले. वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम करायचे. एखादा परीसरातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षा पास होऊन नोकरी लागला तर त्याला मार्गदर्शन कण्यासाठी बोलवायचे. व विद्यार्थी असा विचार करायचे की आमच्या परिसरातील आमच्या समाजातील हा विद्यार्थी स्पर्धा परीक्षा पास होऊन चांगला अधिकारी होतो मग आपण का होणार नाही. अशा प्रयत्नामुळे विद्यार्थ्यांना शालेय दशेतच ते स्पर्धा परीक्षेचे बाळकडू देण्याचा प्रयत्न करायचे.

त्यामुळे सरांचे अनेक विद्यार्थी आज चांगल्या विभागांमध्ये सेवा बजावत आहेत. ही आनंदाची गोष्ट आहे. त्यातील काही प्रातिनिधिक उदाहरणे द्यावयाची झाल्यास गोरख बोऱ्हाडे- जलसंपदा विभाग, मनोज रोंगटे- कृषी विभाग, लहामटे- पशुवैद्यकीय अधिकारी, सुनील कोकाटे- अभियंता नवी मुंबई, राजेंद्र भवारी - मंत्रालय असे अनेक सरांचे विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. विद्यालयामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धा परीक्षांना विद्यार्थी बसवायचे त्यामुळे अनेक विद्यार्थी एन.एम. एम. एस. परीक्षा पास होऊन शिष्यवृत्तीस पात्र ठरलेले आहेत. अभिनव मधे व दुसरा विशाल हंबीर यांची नवोदय विद्यालयात निवड झाली आहे. तसेच अनेक विद्यार्थ्यांची एकलव्य विद्यालयातही निवड झाली आहे.

त्यांनी राबविलेला एक आगळा-वेगळा मन भावलेला उपक्रम म्हणजे १०/१२ नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवेश देऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे. बऱ्याच शाळा निकाल कमी लागेल म्हणून १०/१२ वीला नवीन प्रवेश देत नाहीत. सरांची शाळा मात्र त्याला अपवाद होती. त्यामुळे आज अनेक विद्यार्थी चांगल्या मार्कांनी पास होऊन वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. हे पाहून मनस्वी समाधान वाटते.

त्यांच्या कालखंडामध्ये आमलेश्वर विद्यालय, आंभोळ या ठिकाणी स्वराज्य प्रतिष्ठाण ने आयोजित जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत शेंडी विद्यालयाने आदिवासी नृत्य या गीताने प्रथम क्रमांक पटकावला होता. ते प्रत्येक वर्षी गॅदरिंग ३१ जानेवारी म्हणजे स्वर्गीय माजी आमदार यशवंतराव भांगरे यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी आयोजित करून त्यांच्या पवित्र स्मृतींना विद्यालयाच्या वतीने अभिवादन करत असतात.

१९८७ पासून या विद्यालयात १० वीचे परीक्षा केंद्र आहे. ते या परीक्षा केंद्राचे केंद्र संचालक असायचे. परिसरातील १० विद्यालयाचे विद्यार्थी या परीक्षा केंद्रावर परीक्षा देण्यासाठी येत असत. कुणाचीही काहीही गैरसोय होऊ नये म्हणून त्यांनी सर्व मुख्याध्यापकांशी योग्य समन्वय ठेवून परीक्षा केंद्र कसे सुरळीत चालेल यासाठी विशेष प्रयत्न केले. गावातील महत्वाच्या व्यक्तींची दक्षता समिती स्थापन करून त्या समितीचे दिलिपराव भांगरे हे कायम अध्यक्ष राहिले व परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी त्यांचे सहकार्य घेतले.

विद्यालयामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ चार भिंतीच्या आतील शिक्षणावर भर न देता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून अनेक उपक्रम राबविले. त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक सहल, क्रीडा स्पर्धा, वाढदिवस साजरे करणे, आनंद मेळावा घेणे, व्याख्याने आयोजित करणे, वनभोजन करणे सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने गरजू व गरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेणे. त्यांना यथाशक्ती मदतीचा हात देऊन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केले. सरांच्या या विविध अंगी कामाची पावती म्हणून त्यांना सन २००८ -२००९ साली ईब्टा संघटनेचा आदर्श प्राचार्य पुरस्कार मिळाला तसेच २०२२ - २०२३ यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार देखील मिळाला आणि सन २०२३-२४ या साली त्यांना जिल्हा मुख्याध्यापक संघाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार मिळाला. त्याबद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन.

असे कल्पक नेतृत्व नियत वयोवनानुसार ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. प्रथमतः त्यांच्या या महान कार्यास परिसराच्या वतीने मी मनःपूर्वक सलाम करतो, त्यांचे अभिनंदन करतो. निवृत्ती नंतरच्या काळात समाजाची सेवा करण्यासाठी परमेश्वर त्यांना निरोगी उदंड आयुष्य देवो अशी प्रार्थना करून त्यांच्या भावी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

धन्यवाद..! **शब्दांकन– दिलीपराव भांगरे**
**संकलन –संजय महानोर**







नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल................... 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........................ 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# महिलांना 'शी बॉक्स'मुळे तत्काळ संरक्षण

## अद्ययावत डिजिटल यंत्रणेमुळे तक्रारींचा जलद निपटारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - महिलांचा कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ रोखण्यासाठी महिला आणि बाल विकास मंत्रालयमार्फत कार्यान्वित करण्यात आलेल्या 'शी-बॉक्स'या ऑनलाइन प्रणालीची व्याप्ती आता वाढविण्यात आली आहे. अद्ययावत करण्यात आलेल्या या पोर्टलद्वारे महिलांना आता केवळ कार्यस्थळावरील छळच नव्हे, तर सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या छेडछाड, शेरेबाजी किंवा रस्त्यावरील उपद्रवी प्रकारांविरोधातही थेट तक्रार नोंदविता येणार आहे अशी माहिती महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी दिली.





पूर्वी 'शी-बॉक्स' पोर्टलचा वापर प्रामुख्याने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या तक्रारींसाठी मर्यादित होता. मात्र, नव्या अद्ययावतीकरणामुळे महिलांच्या सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हेपोर्टल***(https://shebox.wed.gov.in)*** प्रभावी ठरणार आहे.

महिलांना सोप्या पद्धतीने ऑनलाइन तक्रार नोंदविता येते. पोर्टलवर जाऊन तुमची तक्रार नोंदवा पर्याय निवडावा, मोबाईल क्रमांक नोंदवून ओटीपीद्वारे लॉगिन करावे, त्यानंतर स्वतःची माहिती, कार्यस्थळ किंवा घटनास्थळ, छळाचा प्रकार आणि आरोपीची माहिती भरावी. आवश्यक असल्यास पुरावे अपलोड करून तक्रार सबमिट केल्यानंतर रेफरन्स नंबरद्वारे स्थिती ट्रॅक करता येते. जर संबंधित संस्थेची आयसी नोंदणीकृत नसेल, तर तक्रार आपोआप जिल्हा किंवा राज्य स्तरावरील समितीकडे पाठवली जाते.

अद्ययावत प्रणालीमुळे तक्रार प्राप्त होताच संबंधित परिसरातील पोलिस ठाण्याला तातडीने माहिती पाठविली जाते. त्यामुळे प्रशासकीय विलंब टळून पोलिसांकडून त्वरित मदत मिळणे आणि संशयितांवर कायदेशीर कारवाई करणे शक्य होते. तक्रार नोंदविल्यानंतर पोर्टलवर लॉगिन करून 'तुमच्या तक्रारीचा मागोवा घ्या' विभागात जाऊन रेफरन्स नंबर, मोबाईल किंवा ई मेल वापरून तक्रारीची सद्यस्थिती, चौकशीची प्रगती आणि निकाल पाहता येतो. ई मेल व एसएमएसद्वारेही अद्ययावत माहिती मिळते.

'शी-बॉक्स' पोर्टल सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यपरिसर निर्माण करण्यासाठी, तसेच सार्वजनिक ठिकाणी महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे साधन ठरत आहे. डिजिटल यंत्रणेमुळे तक्रारींचे जलद निपटारा, पारदर्शकता आणि जबाबदारी वाढण्यास मदत होत आहे.

महिलांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारने 'शी-बॉक्स' पोर्टल अधिक सक्षम केले आहे. महिलांनी या सुविधेचा प्रभावी वापर करून छळाविरोधात पुढे यावे. तक्रार प्राप्त होताच पोलिसांकडून तत्काळ मदत उपलब्ध करून दिली जाईल, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी कदम यांनी केले आहे.

या शी-बॉक्सची कार्यप्रणाली पुढील प्रमाणे असेल - 'शी-बॉक्स' ही केंद्र सरकारची एक एकात्मिक तक्रार नोंद प्रणाली आहे. महिली सरकारी, खासगी, तसेच असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी खुली आहे. या पोर्टलवर तक्रार नोंदविल्यानंतर ती संबंधित आंतरिक समिती किंवा स्थानिक समितीकडे स्वयंचलितपणे पाठवली जाते. देशभरातील मंत्रालये, विभाग, जिल्हे आणि पोलिस यंत्रणांशी डिजिटल जोडणी, नोडल अधिकाऱ्यांमार्फत तक्रारींचे निरीक्षण, ९० दिवसांच्या कालावधीत चौकशी पूर्ण करण्याची तरतूद, तक्रारदाराची गोपनीयता पूर्णपणे सुरक्षित ठेवणे आणि प्रकरणांच्या प्रगतीवर ऑनलाइन लक्ष ठेवण्याची सुविधा ही या पोर्टलची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत

# कोकणगाव येथून स्ट्रीट लाईटचे ७ पोल व हायमॅक्स दिव्यांची चोरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील कोकणगाव येथून १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सार्वजनिक सुविधेसाठी बसवण्यात आलेले स्ट्रीट लाईटचे तब्बल सात पोल आणि हायमॅक्सचे दिवे चोरीला गेल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. यामुळे खाजगी सह ग्रामपंचायत मालमत्तेच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कोकणगाव - मनोली रोडवरील

'खालचा मळा' या वस्तीवर ग्रामस्थांच्या सोयीसाठी १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून पथदिवे (स्ट्रीट लाईट) बसवण्यात आले होते. मात्र, अज्ञात व्यक्तीने येथील सात पोल आणि सात हायमॅक्स लाईट लंपास केले आहेत. ही बाब उघडकीस आल्यानंतर परिसरात चर्चेला उधाण आले असून सरकारी मालमत्ता अशी गायब झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिक हौशीराम माधव जोंधळे यांनी याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'चोरीला गेलेले सर्व पोल आणि लाईट आम्हाला तात्काळ सुस्थितीत परत बसवून मिळावेत आणि या मागील दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी.' तसेच प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल न घेतल्यास, मळ्यातील सर्व नागरिक एकत्र येऊन 'कोल्हार घोटी' राज्य महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करतील, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

हौशीराम जोंधळे यांनी हे निवेदन कोकणगाव-शिवापूर ग्रामपंचायत, संगमनेर तालुका पोलीस स्टेशन, संगमनेर पंचायत समिती, आमदार अमोल खताळ यांच्यासह पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संगमनेर येथील कार्यालयात देखील दिले आहे. दरम्यान, या निवेदनावर सुमारे ४० ते ४५ महिला व पुरुष ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

# पैसे नसतील तर लाडकी बहीण योजना बंद करावी

## हायकोर्टाने राज्य सरकारला फटकारले

युवावार्ता (प्रतिनिधी)

राज्यातील महायुती सरकारसाठी अतिशय महत्वाकांक्षी ठरलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसंदर्भात एक अतिशय महत्वपूर्ण बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळेच महायुतीनं विधानसभा निवडणुकांमध्ये बाजी मारल्याचं अनेक नेत्यांनी उघडपणे बोलूनही दाखवलं आहे. मात्र याच योजनेचा परिणाम आता इतर मूलभूत योजनांच्या निधीवाटपावर होत असल्याचे चित्र आहे. याच मुद्द्यांवर बोट ठेवत आता लाडकी बहीण योजनेवरून मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला तीव्र शब्दात फटकारले आहे. सातव्या वेतन आयोगानुसार शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन तसेच अन्य लाभ देण्यास राज्य सरकारकडे पैसे नसतील, तर लाडकी बहीण योजना बंद करावी, असं महत्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयने नोंदवलं आहे.

दरम्यान, मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या महिलेने तिला सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतनासह अन्य लाभ न दिल्याने या महिलेने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर पालिकेच्या वकिलांची कोर्टात आपली भूमिका मांडताना सांगितलं कि, सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन तसेच अन्य लाभ देण्यासाठी पालिकेकडे पैसे नाहीत, कारण राज्य सरकार पैसे देत नसल्याची भूमिका मांडली. तर लाडकी बहीण योजनेसाठी ४० हजार कोटी खर्च करता, मग पैसे कसे नाहीत? अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला केली आहे. सरकार असं का वागतंय तर लाडकी बहीण योजनाच बंद केली पाहिजे. असेही मुंबई उच्च न्यायालयाने म्हटलंय. राज्यात विधानसभा निवडणुकीपासून सुरू झालेल्या 'लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थी महिलांच्या ई-केवायसी प्रक्रियेत ७१ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. या महिलांनी ई-केवायसी केले नसल्याने त्या या योजनेत बसत नव्हत्या हे स्पष्ट झाले आहे. या योजनेत २ कोटी ४३ लाख महिलांनी नोंदणी केली होती आणि त्यांना दरमहा १,५०० रुपये मदत मिळत होती. त्यामुळे सरकारी तिजोरीवर वर्षाला ४३,७४० कोटी रुपयांचा बोजा येत होता. (डरवज्ञळ इरहळप धेक्षरपर)

या लाडकी बहीण योजनेचा फटका काही प्रमाणात इतर योजनांना देखील बसला होता, राज्याची आर्थिक घडी या योजनेमुळे काहीशी विस्कटल्याने अपात्र महिला शोधण्याची मोहीम महिला व बालकल्याण विभागाने राबवली होती.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग – १० जागा
टेली कॉलिंग – १० जागा
सेल्स ऑफिसर – ०५ जागा
ड्रायव्हर – ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग
• मधुमेह व हृदयरोग
• दमा व श्वसनाचे विकार
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
• जनरल सर्जरी
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
• किडनी विकार
• मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• सर्पदंश व विषबाधा
• बालरोग चिकित्सा विभाग
• प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13





कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
KH
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25